**आ.अमृतचंद्र सूरि**

आचार्य कुंदकुंदांच्या नंतर आध्यात्मिक विद्वान साहित्यिक म्हणून अमृतचंद्र सूरींचे नाव घेतले जाते. आचार्य कुंदकुंदाच्या आध्यात्मिक साहित्यावर टीका लिहिणारे अमृतचंद्र हे प्रथम आचार्य होते. अमृतचंद्र सूरींच्या गुरू-शिष्य परंपरेविषयी अथवा काळाविषयी निश्चित माहिती मिळू शकत नाही. आपल्या एका ग्रंथाच्या शेवटी त्यांनी म्हटले आहे की, वर्णानी पदें तयार होतात. पदांनी वाक्ये आणि वाक्यांनी पवित्र शास्त्र तयार होते. आपण स्वतः निमित्त मात्र आहोत २- अन्य ग्रंथातून देखील त्यांनी आपली माहिती न देता प्रसिध्दी पराङमुख राहण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे त्यांनी लिहिलेल्या प्रशस्तीमध्ये सुध्दा त्यांचा उल्लेख आढळत नाही.

आचार्य अमृतचंद्र सूरी आध्यात्मिक संत होते. कारण त्यांनी आचार्य कुंदकुंदविरचित प्रवचनसार,

पंचास्तिकाय व समयप्राभृत यासारख्या आध्यात्मिक ग्रंथावर अत्यंत महत्वपूर्ण टीका लिहिल्या. याशिवाय ते एकान्त मार्गाचे पथिक नसून अनेकांतवादाचे भक्त व प्रबल समर्थक होते. कारण काही ठिकाणी त्यांनी मंगलस्वरूप भ.जिनंद्राची ज्ञानज्योत सदैव तेवत राहण्याची भावना प्रकट केली असून अनेकांतवादाला नमस्कार केला आहे. अनेकांतवादाला परमागमाचे बीज मानून एकान्तवादाचा समन्वय करणारे म्हटले आहे. अनेकांतवादाचे विवेचन करताना भाषा पांडित्यपूर्ण झाली असून काही ठिकाणी कठिण वाटते. उमास्वातीच्या तत्त्वार्थसूत्राच्या केलेल्या पद्यानुवादावरून त्यांची रचनाशैली अत्यंत प्रगल्भ आणि चित्ताकृर्षक वाटते. आत्मख्याती टीकेपासून अलग मानला तर समयसारकलश हा त्यांचा एक स्वतंत्र ग्रंथ होऊ शकेल.

**जीवनकालविषयक माहिती -**

आचार्य अमृतचंद्र सूरींच्या जीवनकालाविषयी निर्णायक माहिती मिळत नाही. जी कांही माहिती उपलब्ध आहे ती खालीलप्रमाणे -

---

१. जैन साहित्य और इतिहास - नाथूराम प्रेमी पृ.नं.१०२ ते १०३

२. वर्णै:कृतानि चित्रै: पदानि तु पदै: क.तानि वाक्यानि । वाक्यै:कृतं पवित्रं शास्त्रमिदं न पुनरस्माभि ॥ पु.सि.

आशाधराने आपल्या अनगार धर्मामृताच्या भव्य कुमुदचंद्रिका टीकेत अमृतचंद्राला दोन ठिकाणी ठक्कुर या नावाने संबोधले आहे.

एतच्च विस्तरेण ठक्कुरामृतचंद्रसूरिविरिचितसमयसारटीकाव्यांद्रष्टव्यम् पृ.५८८

अर्थात ठक्कूर आणि ठाकूर एकार्थवाची शब्द आहे. कुठल्याहि वर्णातील अथवा जातीतील जहागीरदारांना ठाकू असे म्हणतात. काही ब्राह्मणंना देखील ठक्कूर म्हटले आहे. उदा. मैथिल कोकील विद्यापति गहडवाल- मधील दानपत्रातून ठक्कूर आणि राउल ब्राह्मणांची चर्चा पाहावयास मिळते. काही ठिकाणी ठक्कूर ही उपाधि देखिल दिलेली दिसून येते. अर्थात अमृतचंद्र दुसरे नाव ठक्कूर असून कादाचित ठाकूर हे आडनाव असावे.

आ. शुभचंद्राने आपल्या ज्ञानार्णव (पृ.१७७) मध्ये पुरूषार्थ - सिध्युपायाचे मिथ्यात्ववेदरागा इ. पद्यात उक्तंच रूपात उध्दृत केले आहे. यावरून अमृतचंद्र शुभचंद्राच्या अगोदर होऊन गेल्याचे मानले आहे व पद्मप्रभ मलधारिदेवाने शुभचंद्राच्या ज्ञानार्णव मधील एक श्लोक दिला आहे. यावरून शुभचंद्र पद्मप्रभाच्या अगोदरचे असावेत. पद्मप्रभाचा काल, विक्रम संवत बाराव्या शतकाच्या उत्तरार्ध व तेराव्या शतकाच्या पूर्वार्ध मानला आहे. यावरून अमृतचंद्राचा काळा विक्रम संवत बाराव्या शतकाच्या नंतरचा मानता येत नाही.

अपभ्रंश भाषेतील प्रद्युम्न चरित २ या ग्रथावरून अमृतचंद्राविषयी काही माहिती मिळते. अमृतचंद्र मलधारि माधवचंद्रचे शिष्य असून विहार करीत बांभणवाडा नावाच्या नगरात आले होते व

त्यांच्याच प्रेरणेने सिंहकवीने प्रद्युम्नचरित्राची रचना केली३. बांभ्णवाडचा राजा गुहिलवंशी क्षत्रिय असून मालव नेरेश बल्लाळाचा मांडलिक होता. या बल्लाळाच्या चालुक्य कुमारपालने पराजय केला आहेत. कुमारपालाची कारकीर्द विक्रम सवंत १२२९ पर्यत मानली आहे. म्हणून प्रद्युम्न चरित्राचा रचनाकाळ आणि आ.अमृतचंद्राचा काळ या दरम्यान ठरविता येतो.

पं. परमानंदजी शास्त्री (अनेकांत ८ अंक ४५) यांच्या मते जयसेनाच्या धर्मरत्नाकरात पुरुषार्थ सिध्द्युपाय मधील ५९ पद्य अधृत केल्याचे दिसते. जयसेना ाने आपला हा ग्रंथ विक्रम संवत १०५५ मध्ये तयार केला असे त्याच्या प्रशस्तितील शेवटच्या पद्यावरून दिसून येते. म्हणून अमृतचंद्राला कुमारपाल कालीन मानणे युक्त नाही. वि.सं.१०५५ पूर्वी अमृतचंद्राचार्य नक्की असावेत.

भावसेनाचा शिष्य जयसेन हा लाड-बागड संघाचा होता व प्रद्युम्नचरित्राचा कर्ता महासेन याच संघाचा असून जयसेनाचा प्रशिष्य होता. तो परमार राजा मुंज आणि सिंधलाच्या समकालीन होता. त्यांच्याशी देखील अमृतचंद्राचा संबंध यथायोग्य बसतो.

डॉ.अे.अेन. उपाध्ये यांच्या मते, अमृतचंद्र सूरीचे नाव बहुधा कोणत्याही शिलालेखात सापडत नाही. अमृतचंद्राने कही उतारे सिध्दसेनापासून घेतले आहेत. म्हणून त्यांचा काल ७ व्या शतकाच्या अगोदरचा नसावा. अमृतचंद्रापूर्वीच्या दोन शतकात तो होऊन गेला असावा. असेच अमृतचंद्राने केवलज्ञ ाानाविषयी लिहिताना कुमारील भट्टाच्या दृष्टीकोनाचाही विचार केला आहे. कुमारील भट्ट ७ व्या शतकाच्या सुरूवातीस असावेत. जयसेन व पुष्पदंत यांच्या काल विचारानुसार अमृतचंद्र ७ ते १२ व्या शतकात हाऊन गेले असावेत. याशिवाय त्यांनी नेमिचंद्राने लिहिलेल्या गोम्मटसार (इ.स.१० वे शतक) मधल गाथांचा देखील उल्लेख केला आहे. ढाढसी गाथेत काष्ठासंघ, मूलसंघ आणि निःपिच्छिक (माथु) संधाचा उल्लेख आहे. परंतु त्यानुसार देखील अमृतचंद्राच्या कालनिर्णयाविषयी विशेष मदत मिळू शकत नाही. १) वरील विवेचनावरून अमृतचंद्राचा काळ १० वे शतकच असावा. अर्थात हे मत निर्णायक मानता येणार नाही. मात्र अमृतचंद्र हे एक महान टीकाकर्ते व अध्यात्मशास्त्राचेभोक्ते होते यात शंका नाही.

**ग्रंथसंपत्ती -**

आ.अमृतचंद्र सूरींनी विविध प्रकारची साहित्यरचना करून कुंदकुंदानी सांगितलेल आध्यात्मिक

ज्ञान आपल्या ग्रंथ व टीकाद्वारे सुलभ केले व सर्वसामान्य लोकापर्यंत पोहचविण्याचे महान कार्य केले. त्यांचे एकूण सह ग्रंथ उपलब्ध असून ते सर्व संस्कृत भाषेत आहेत.

१ पुरूषार्थसिध्दयुपाय २ तत्वार्थसार ३ लघुतत्वस्फीट किंवा शक्तिमणिकोश ४ समयसाराची आत्मख्याती टीका.५ प्रवचनसार टीका. ६ पंचास्तिकाय टीका.

१ **पुरूषार्थ सिध्दयुपाय** - आ. अमृतचंद्राचा पुरूषार्थ सिध्दयुपाय हा आचारविषयक अद्‌भूत ग्रंथ आहे. मुनष्याचा पुरुषार्थ कोणता व त्याची सिध्दी कोणत्या उपायाने होते या गोष्टीचे हृदयंगम वर्णन केल आहे. आचार्य अमृतचंद्रांची ही स्वतंत्र कृति आहे. आपल्या महान पुरुषार्थाद्वारे जैन आगम महोदधीचे मंथन करून अमृतरूपाने जे काही प्राप्त केले ते आपल्या या ग्रंथात अत्यंत चित्ताकर्षक, सरळ तसेच प्रसादगुण भाषेत एकत्रित केले आहे. हिंसा म्हणजे काय व अहिंसा म्हणजे काय याच`विविध दृष्टिकोनातून फार सुंदर वर्णन प्रस्तूत ग्रंथात केले आहे. या ग्रंथात एकूण २२६ श्लोक असून ते सर्व आर्या छंदात आहेत. हा ग्रंथ खालील एकूण सह भागात विभागला आहे.

१ ग्रंथपीठिका (श्लाक १ ते १९) मंगल, तत्वमूल कार्यकारण भाव यांचे वर्णन.

२ सम्यग्दर्शनाधिकार - (श्लोक २० ते ३०) स्वरूप व आठ अंगाचे निश्चयव्यवहार कथन.

३ सम्यग्ज्ञानाधिकार - (श्लोक ३१ ते ३६) सम्यग्दर्शनापासून कार्यकारणसंबंधापर्यंतचे कथन.

४ सम्यक्चारित्राधिकार - (श्लोक ३७ ते १७४ ) १२ व्रतांची अहिंसा व पोषकता वर्णन.

५ सल्लखनाधिकार - (श्लाक १७५ ते १९६) यात व्रताचारांचेही वर्णन आहेत.

६ सकलचारित्राधिकार - (श्लोक १९७ ते २२६) यात रत्नत्रय धर्माची निदोषता प्रयत्नपूर्व सिध्द केली आहे.

प्रस्तूत ग्रंथात पुरूष शब्दाचा अर्थ चिदात्मा असा असून तो स्पर्श इत्यादीपासून रहित असतो. आपल्या ज्ञानादि पर्यायात तो तन्मय असतो. तसेच उत्पाद, व्यय, ध्रौव्य या द्रव्याच्या दुसऱ्या लक्षणानी युक्त असतो. चिदात ज्ञानचेतना, कर्मचेतना व कम्फलचेतनांनी युक्त असतो. विकाररहित राहून स्थिर ज्ञानकरूप व चैतन्यरूपाने युक्त होणे हीच उपासना करणे हे श्रावकाचे आद्य कर्तव्य आहे. सम्यग्दर्शनाप्रमाणेच या ग्रथात सम्यग्ज्ञानाची आठ अंगे सांगितली आहेत. त्यांचे स्वरूप मननीय आहे. सम्यक्चरित्राधिकारात हिंवा व अहिंसा यांचे सुदंर विवेचन केले आहे. असत्याचे चार प्रकार सांगितले असून बाहय तप व अभ्यंतर तपाबारेबर सूक्ष्म तत्वाचेही सुदंर वर्णन केले आहे. विवेकापासून अमृतस्वरूप आचारसाराचा रसास्वाद घेणे हा अंतरात्म्याचा परम पुरुषार्थ आहे. त्याच्याद्वारे परमात्मपदाची व शाश्वत स्वरुपाची प्राप्ती होते. आ. अमृतचंद्राच्या पुरुषार्थसिध्दयुपाय ग्रंथाला उपासक श्रावकांची आचारसंहिता असे म्हटले तरी अतिशयोक्ति होणार नाही.

---

१. सप्ततत्तवपीठीका - (श्लोक ५४) सम्यग्दर्शन, ज्ञान व चरित्र स्वरूप मोक्षमार्ग यांचे विवेचन.

२. जीवनतत्ववर्णन - (श्लोक २३८) यात जीव लक्षण, जीवांचे विविध प्रकार, त्यांचे आयुष्य, त्यांच्या शुभाशुभ कर्मानुसार मिळाणारी स्थाने, इत्यादीचे विस्तृत विवेचन केले आहे.

३.अजीवतत्त्ववर्णन - (श्लोक ७७) धर्म, अधर्म, आकाश, काल व पुद्गल ही पाच अजीव तत्वे असून जीवासहित ती सहा द्रव्ये मानली आहेत. प्रसंगानुसार काल आणि पुद्गलं द्रव्य यांचे भेदोपभेद सांगितले आहेत.

४.आस्त्रव तत्त्ववर्णन - (श्लोक १०५) योगाद्वारे कर्माचा आस्त्रव होतो या योगालाच आस्त्रव असे म्हटले आहे. शरीर, वचन आणि मनक्रिया यांचेच नाव योग आहे. शुभ अशुभ कर्मानुसार हा कमी आधिक प्रमाणात असतो.

५) बंधतत्व वर्णन - (श्लोक ५४) यात सर्वप्रथम मिथ्यात्व, असंयम, प्रमाद, काषाय आणि योग ह्या पाच बंध करणांचा उल्लेख करून क्रमाने त्याचे विवेचन केले आहे.

संवरतत्व - (श्लोक ५२) गुप्ति, समिती, धर्म, परषिहजय, तप, अनुप्रेक्षा आणि चारित्र या कारणांनी आस्त्रवाचा जो निरोध होतो त्याला संवर म्हणतात. त्याचे क्रमाने वर्णन कले आहे.

निर्जरातत्व - (श्लोक ६०) कृतकर्मापासून आत्म्याचे दूर होणे यालानिर्जनरा म्हणतात. तिचे विपाकता आणि अविपाकता असे दोन प्रकार आहेत.

मोक्षतत्व - (श्लोक ५५) बंध कारणांचा अभाव (संवर) व पूर्वबध्द कर्माची निर्जरा झाल्यावर संपूर्ण कर्माचा नाश होणे यालाच मोक्ष म्हणतात.

तत्वार्थसुत्राप्रमाणे तत्वार्थसाराचे १० अध्याय नसून नऊ अध्याय आहेत. पहिल्या अध्यायात सप्ततत्वांची पीठिका असून अंतिम अध्याय सारांशरूप आहे. मधील सात अध्यायात क्रमशः सात तत्वांचे सुंदर सुगम आणि सुस्पष्ट विविचन आले आहे. जैन धर्मामृतातील ७ व्या अध्यायापासून १३ व्या अध्यायापर्यंतचे सर्व श्लोक तत्वार्थसारातून घेतले आहेत.

३. लघुत्वस्फोट किंवा शक्तिमणिकोश - आ. अमृतचंद्राची ही श्रेष्ठ कृति आजपर्यत दिगंबर पंथाला अज्ञात होती. सद्भाग्याने या ग्रंथाची एक ताडपत्रीय प्रत अहमदाबादमधील श्वेतांबर जैन मंदिराच्या डेला भंडारात असल्याचे मुनिराज श्री पुण्यविजय यांनी सांगितले आहे२. याथवकाश हा ग्रंथ अहमदाबादमधील लालभाई दलपतभाई विद्यामंदिराकडून प्रकाशित होईल.

लघुतत्वस्फोट ग्रंथात ६२५ श्लोक आहेत. संपूर्ण ग्रंथ हा एक महान स्तोत्र आहे. या ग्रथाद्वारे आचार्यांनी जैन तत्वाचे व विशेषतः अनेकान्ताचे रसपूर्ण विवेचन केले आहे. यातील भाषा पांडित्यपूर्ण असून थोडी कठीण आहे. या ग्रंथाच्या प्रारंभी जिननामवली दिली असून यात कौशल्याने २४ तीर्थकांरांची नावे गुंफली आहेत. सत्-असत्, द्वैत-अद्वैत, नित्य-अनित्य इ. द्वंद्वात्मक गोष्टीना एकत्र करून अनेकांतवादात्मक सतद्रव्याचे स्पष्टीकरण जिननामावलीत केले आहे.

४. आत्मख्याति टीका - (समयसार कलश) वरील तीन ग्रंथाशिवाय प्रवचनकार, पंचास्तिकाय व समयसार या रत्नत्रयीवर अनुक्रमे तत्वदीपिका, तत्वप्रदीपिका व आत्मख्याति हया सुंदर टीका लिहिल्या आहेत. या सर्व टीका संस्कृतमधून लिहिल्या आहेत. प्राकृत भाषेचाही त्यांचा अभ्यास असून प्राकृतमध्ये त्यांनी काही गाथांची रचना केलेली असावी.

कुठल्याही ग्रंथाचा आधार न घेता व आत्मख्याति टीकेपासून वेगळा मानला तर समयसार कलश हा त्यांचा स्वतंत्र ग्रंथ आहे१ शुभचंद्राने त्यावर टीका लिहिली आहे.

अमृतचंद्राची भाषाशैली -

महान ग्रंथकार व टीकाकार या नात्याने आ.अमृतचंद्रांचे स्थान अत्यंत महत्वाचे आहे. त्यांची भाषा सरळ, सुंदर, प्रसाद गुणांनी युक्त असून पांडित्यपूर्ण आहे. काही ठिकाणी आकलन होण्यास थोडी कठीण आहे. तत्वज्ञानविषयक विवेचन सखोलपणे केले आहे. त्यांची अनेकांतवादाविषयीची उत्सुकता फार मोठी आणि महत्वाची दिसते. त्याविषयी त्यांच्या ग्रंथातून अथवा जिननामावलीतून आपणाला माहिती मिळते. श्वेतांबर - दिगंबर दोन्ही पंथाच्या कार्याविषयी त्याना माहिती दिसते. जैन तत्वज्ञानातील काही ठराविक व अर्थपूर्ण शब्दांची चर्चा त्यांनी अगदी सहज व सुलभतेने केली आहे.

आ.अमृतचंद्र लेखकापेक्षा कविस्वरूपातच अधिक प्रभावी होते हे त्यांच्या ग्रंथ व टीकांचे अवलोकन केले असता दिसून येते. समयसार कलश हा ग्रंथ रसपूर्ण व गेय गाथांनी युक्त आहे. भाषावैशिष्ठयाकडे मन आकर्षित करण्याचा प्रयत्न त्यांनी ठिकठिकाणी केलेला दिसतो. अर्थातच या महान ग्रंथकर्त्याच्या भाषाशैलीचा प्रभाव त्यांच्या नंतरच्या जयसेन व पद्मप्रभदेव यांच्यावर झालेला दिसतो.

आ.अमृतचंद्राचे तत्त्वविवेचन लोकविलक्षण व अद्‌भूत गोष्टींना युक्त आहे. तसेच त्यांच्या ग्रंथाची पशस्ती त्यांच्या आत्मउच्चतेची द्योतक आहे. संस्कृत भाषाशास्त्र आणि व्याकरण यावर त्यांचा पूर्ण अधिकार असून त्यांची टीका म्हणजे आदर्श टीकेचा एक उत्कृष्ट नमूना आहे असे सर्वच संस्कृततज्ञ आजसुध्दा मानतात. न्यायविषय विवेचन शास्त्रातील पध्दतीने प्रतिज्ञा हेतुपूर्वक त्यांनी केले आहे. त्यामुळे संपूर्ण विवेचनास तार्किकतेची आधारशिला प्राप्त झाली आहे. शांतरसाच्या मदतीने आध्यात्माचा महान आशय या श्रेष्ठ आचार्याच्या लेखणीतून अपूर्वपणे उतरला आहे. तत्वज्ञानमहाभंडारातील अफाट संपत्ती त्यांनी सर्वसामान्य लोकासाठी उपलब्ध करून त्यांच्यावर अनंत उपकार केले आहेत.

**आ.जिनसेन**

आ.जिनसेन हे आदिपुराण या महाग्रंथाचे कर्ते असून हरिवंशपुराणकर्ते आ.जिनसेन यांच्यापेक्षा भिन्न आहेत. आ.जिनसेन हे. आ.वीरसेनाचे शिष्य असून आर्यनंदीचे प्रशिष्य होते. शिवाय ते पंचस्तूप संघाचे असून त्याच संघाचे नाव पुढे सेनसंघ झाले. उलट आचार्य जिनसेन हे कीर्तिषेणाचे शिष्य व जिनसेनाचे प्रशिष्य असून पुन्नाट संघाचे आचार्य होते.२ आ.हरिवंश जिनसेनांचा काल साधारणपणे इ.स.७९० ते ८५० असून पुन्नाटसघीय आ. जिनसेन यांचा काळ इ.स.७८३ इतका आहे३. याठिकाणी पंचस्तूपसंघीय आ.भ.जिनसेन (आदिपुराणकर्ते) यांची आधिक माहिती देण्यात येत आहे.

आ.जिनसेन हे महान विद्वान असून जैन सिध्दांताचे प्रकांड पंडित होते. त्यांनी आपले गुरू आ.वीरसेन यांनी लिहिलेल्या धवला व जयधवला टीका पूर्ण करून जैन समाजावर महान उपकार केले

आहेत.  आदिपुराण व पार्श्वाभ्युदय हे दोन महाग्रंथ लिहून जैन साहित्यात मोलाची भर घातली आहे. त्यांचा आदिपुराण हा एक अतिश्रेष्ठ ग्रंथ असून प्रथमानुयोगातील ते महाकाव्य आहे१.  हा ग्रंथ लिहिताना आ.जिनसेन यांचा मधेच स्वर्गवास झाला.  पुढे तो ग्रथ त्यांचेच शिष्य आ.गुणभद्र यानी पुरा केला.

आ.जिनसेनांनी स्वतःला अविध्दकर्ण असे म्हटले आहे. त्यावरून त्यांनी बालवयातच दीक्षा घेतली असावी असे दिसते. ते एक महान कवि होते.  आपल्या तारूण्यावस्थेत त्यांनी कालीदासाच्या मेघदूत काव्याला अंतर्भूत करून पार्श्वाभ्युदय नावाचे सुंदर काव्य रचले.

आ.जिनसेन यांनी पार्श्वाभ्युदयाची रचना करीत असताना मेघदूताच्या एका ठिकाणी एक चरण व काही ठिकाणी दोन चरण घेऊन पार्श्वाभ्युदयाची रचना केली आहे.

जयधवल टीकेच्या प्रशस्तिमध्ये आ.जिनसेनांनी स्वतःचा परिचय मोठया सुंदर व अलंकारिक शैलीत दिला आहे. त्यांचा सारांश असा आ.जिनसेनांचे दोन्ही कर्ण अविध्द असून सुध्दा ते ज्ञानशलाकेने वेधले होते. अर्थात कर्णवेध संस्कारापूर्वीच त्यांनी दीक्षा घेतली.

लहानपणापासून अखंडित व कठोर ब्रह्मचर्य व्रताचे पालन केले होते. त्यांचे हे व्रत पाहून सरस्वती जणु चित्रात रेखाटल्याप्रमाणे मंत्रमुग्ध झाली होती. स्वतः फार सुंदर अथवा फार चतुर असून सुध्दा अनन्यसाधारण होऊन त्यांनी सरस्वती देवीची सेवा केली होती.  शरीर कृश असून सुध्दा तपाने युक्त असलेले ते कृश नव्हते शारिरीक कृशत्वापेक्षा गुणानी कृश होणे खरे कृशत्व आहे.  सांरला वगैरे शरंगाचे अधिक चिंतन न करता देखील ते आध्यात्म विद्यासागराच्या पैलतीरी पाहेचले होते. म्हणूनच तत्वदर्शनकारांनी त्यांना ज्ञानमयोपिंड अथवा ज्ञानशरीरी म्हणून गौरविले आहे.

**कुल परंपरा -**

वंश दोन प्रकारचा असतो ?  लौकिकवंश आणि पारमार्थिक वंश.  लौकीक वंशाचा संबंध योनीबरोबर असून पारमार्थिक वंशाचा संबंध विद्येबरोबर असतो.

आचार्य जिनसेन व गुणभद्र यांच्या वंश परंपरेविषयी त्यांच्या स्वतःच्या ग्रंथ प्रशस्तिमध्ये अथवा नंतरच्या आचार्याच्या ग्रंथप्रशस्तिमध्ये काही माहिती मिळू शकत नाही.  अर्थातच गृहस्थावस्थेचे स्मरण

करण्याची मुनि जनांना काय आवश्यकता आहे? तथापि आधुनिक ऐतिहासिक दृष्टिकोनातून या गोष्टींचा विचार करणे आवश्यक आहे.

भट्टाकलंकदेवाप्रमाणे राजाश्रित अशा एखादया उच्च ब्राह्मणकुलामध्ये या महात्म्याचा जन्म झाला आसावा. जैन ब्राह्मण (उपाध्याय) किंवा चतुर्थ अथवा पंचम जातीपैकी त्यांनी कोणत्या तरी एका जातीला पावन केले आसावे. कारण ज्या प्रांतात ते रहात होते व ज्या ठिकाणी त्यांचा जन्म झाला होता त्यावेळी तेथे जैन धर्माचे पालन केले जात होते.

भ.महावीर निर्वाणास गेल्यावर सुमारे ७०० वर्षानी मुलसंघामध्ये नंदिसंघ, देवसंघ, सेनसंघ व सिंहसंघ असे चार भेद निर्माण झले. आ.जिनसेन व गुणभद्र यांनी सेनसंघाची दीक्षा घेतली असावी, परंतू सेनसंघाची एखादी पट्टावली उपलब्ध नसल्यामुळे आ.जिनसेनाचार्याच्या पर्यत यथायोग्य गुरूपरंपरा देता येत नाही.

गोम्मटसार ग्रंथाचे जीवकांड व कर्मकांड असे दोन विभाग आहेत. सिध्दांत शास्त्रातील विस्तृत विषयांचे विवेचन या ग्रंथात संक्षिप्त रूपाने घेतले आहे. महाकर्मप्राभृत सिध्दांतातील जीवट्ठाण, खुद्दाबंध, बंधस्वामी, वेदनाखंड, वर्गणाखंड या पाच महान सिध्दांत शास्त्रातील विषयाचे संक्षिप्त संकलन यात केले आहे. यामुळेच या ग्रंथाला दुसरे नाव पंचसंग्रह असे ही दिले आहे.

गोम्मटसार ग्रंथातील जीवकांडात संसारी जीवाच्या कर्माच्या कमी अधिक आवरणप्रमाणे होणा-या विविध अवस्थांचे वर्णन केले आहे. गति, जाति, पर्याप्ति, कषाय, लेश्या, वेद इत्यादी चौदा मार्गणद्वारे कर्माधीन जीवांच्या विविध उच्चनीच अवस्थांचे वर्णन या भागात केले आहे. कर्मकांड विभागामध्ये अष्ट प्रकारची कर्मे, कर्माचे स्वरूप, कर्माचा स्थितीकाल, कर्माची फलदायक शक्ति आणि प्रदेश, इ. जडकर्माच्या अवस्थाचे वर्णन आहे. थोडक्यात या ग्रंथात जीवात्म्याचे मूलस्वरूप, जीवात्म्याच्या कर्मजन्य विविध संसारी अवस्था, जीवत्म्याचे अंतिम ध्येय, त्या ध्येयमार्गात येणारे भावकर्मरूपी अगणित अडथळे, ते कसे टाळावेत यांचे मार्गदर्शन अत्यंत व्यवस्थितरित्या केले आहे. श्रावकाला हा ग्रंथ अत्यंत उपयोगी असून नित्य स्वाध्याय करण्यास योग्य आहे.

या ग्रंथावर चार टीका लिहिल्या गेल्या -

१ चामुंडरायकृत पंजिकास्वरूप कन्नड भाषेतील टीका
२ अभयचंद्र सैध्दांतिकृत टीका
३ केशववर्णीकृत कन्नड टीका
४ ज्ञानभूषणशिष्य नेमिचंद्रायार्यकृत जीवतत्व प्रदीपिका.

**२. लब्धिसार** - या ग्रंथात विस्ताराने कर्मापासून मुक्त हाण्याचा उपाय सांगितला आहे. क्षपणसार याच ग्रंथात अंतर्भूत आहे. कषायप्रायभृत नावाच्या जयधवल सिध्दांताच्या १५ आधिकारातील पच्चिमस्कंध नावाच्या १५ व्या आधिकाराच्या आधाराने हा ग्रंथ लिहिला आहृे या ग्रंथाची रचना चामुंडरायासाठीच केली आहे. कर्मात मोहनीय कर्म अधिक बलवान असून, त्यालाच मिथ्यात्वकर्म म्हटले आहे. कर्मापासून मुक्त हाण्यासाठी लब्धिसारात ५ लाब्धींचे वर्णन केले आहे. यात करणलब्धि प्रमुख आहे. करणलब्धिमुळे

मिथ्यात्वकर्म नष्ट पावून सम्यकत्वाची प्राप्ति होते. लब्धिसारात दर्शनलब्धि, चारित्रलब्धि आणि क्षायिकचरित्र नावाचे तीन अधिकार आहेत. उपशमचरित्र अधिकारापर्यंत केशवर्णीनी टीका लिहिली आहे. या आधारानेच पं टोडरमलजींनी भाषाटीकेची रचना केली आहे. क्षपणधिकार मधील गाथांचे व्याख्यान माधवचंद्र त्रैविद्य यांनी संस्कृत गद्यात केले आहे. यावरून याला लब्धिसार क्षपणसार म्हटले आहे.

३. **त्रिलोकसार** - हा करणनुयोगातील एक सुप्रसिध्द ग्रंथ समजला जातो. गोम्मटसारप्रमाणे हा ग्रंथ देखील संग्रह ग्रंथ आहे. यात बऱ्याचशा प्राचीन परंपरागत गाथा घेतल्या आहे. चामुंडरायाला बोध देण्यासाठी हा ग्रंथ लिहिला गेला. या ग्रंथात उर्ध्व, मध्य व अधोलोक या त्रैलोक्याचे वर्णन केले आहे. ते भौगोलिक आहे. ग्रहनक्षत्रांच्या भ्रमणकक्षा व त्यामुळे होणारा दिवसरात्र, निरनिराळया प्रकारची मोजमापे, गणपध्दती इ. गोष्टींचे या ग्रंथात विवेचन केले आहे.

४. **बृहद्द्रव्यसंग्रह** - काही जणांच्या मते हा ग्रंथ देखील आ.नेमिचंद्र सिध्दांत चक्रवर्तीनीच लिहिला असावा. या ग्रंथाचे एकूण तीन अधिकार असून, यात एकूण ५८ गाथा आहेत. प्रथम अधिकारात जीव, अजीव, धर्म, अधर्म, आकाश आणि काल या ६ द्रव्यांचे वर्णन केले आहे. यात एकूण १ ते २७ गाथांचा समावेश आहे. दुसऱ्या अधिकरात २७ ते ३८ गाथांचा समावेश असून या ९ पदार्थाचे यात संक्षिप्त वर्णन आहे. तिसऱ्या अधिकारात ३९ ते ५८ गाथांचा समावेश असून अधिकारातमोक्षमार्ग (निश्चय व व्यवहार) यांचे वर्णन करून सिध्दिसाठी ध्यानाची आवश्यकता काय ? व ध्यान करणारा कसा असावा ? ध्यानाचा मंत्र कोणता ? ध्यान कोणाचे करावे ? व ध्यानसिध्दीचा उपाय सांगून ग्रंथाचा समारोप केला आहे.

संस्कृत टीकाकार श्री ब्रह्मदेव सूरीने या ग्रंथाच्या प्रस्तावनेत सोमश्रेष्ठीची माहिती देताना लिहिले आहे की, शुध्दात्म द्रव्याच्या सम्यग्ज्ञानापासून उत्पन्न, सुखरूपी अमृतरसास्वादाच्या विपरीत नरकादी दु:खानी भयभीत झालेल्या, परमात्मा भावनेने सुखरूपी सुधारस प्राशन करण्यास आतुर झालेल्या सोमराज श्रेष्ठीसाठी श्री.नेमिचंद्रानी २६ गाथांच्याद्वारे लघुद्रव्य संग्रह या ग्रंथाची रचना केली. नंतर विशेष तत्वज्ञानासाठी विशिष्ठ बृहद्द्रव्यसंग्रह ग्रंथाची रचना केली. या ग्रंथात ग्रंथकर्त्याने पदार्थाचे स्वरूप निश्चयनय व व्यवहारनय या दोन्ही नयांच्या साह्याने सांगितले आहे.

जैन आगमात काही ठिकाणी निश्चयाने व काही ठिकाणी व्यवहारनयाने पदार्थाचे वर्णन अथवा स्वरूप सांगितले जाते. निश्चयानयाच्या कथनात व्यवहारनय गौण राहतो. व्यवहारनयाच्या कथनात निश्चयनय गौण राहतो. नयांचा हा गौण अथवा मुख्य भाव वक्त्याच्या इच्छेवर अवलंबून असतो. गौण अथवा मुख्य भावाचे स्पष्टीकरण न समजल्यामुळे आत्मबुध्दी संभ्रमात पडतात. आ.नेमिचंद्रानी हीच अडचण बरोबर ओळखून की

काय, पदार्थाचे अस्तित्व, निश्चयनय व व्यवहारनय या दोन्ही नयाद्वारे यथास्थित स्पष्ट केले आहे. जीवाचे स्वरूप सांगताना ते म्हणतात -

तिक्काले चदुंपाणा  इंदिय बलमाउ आणपाणो य । ववहारा सो जवो णिच्छयणयदो दु चेदणाजस्स ॥३॥

पुग्गलकम्मादीणं कत्ता ववहारदो दु णिच्छयदो । चेदण कम्मणदा सुध्दणया सुध्दभावणं ॥८॥

अर्थात तीन काळात इंद्रिय, बल, आयु श्वासोश्वास या चार प्राणांना जीव धारण करतो,  तो व्यवहारनयाने जीव आहे आणि निश्चयनयाने ज्याला चेतना आहे.  तो जीव आहे. तसेच आत्मा व्यवहारनयाने पुदगलकर्म इत्यादींचा कर्ता आहे.  आणि निश्चयनयाने चेतन कर्माचा कर्ता आहे, तथा शुध्दनयाने शुध्द भावांचा कर्ता आहे.

येथे ग्रंथकत्याने निश्चयनयापासून शुध्दनयाचे वेगळे कथन केले आहे.  यावरून त्यांना निश्चयनयाचे शुध्द व अशुध्द नय  माहित असून, त्यातील फरक ते स्पष्ट जाणत होते असे दिसते. दोन्ही नयांच्या साह्याने त्यांनी आत्म्याचे सुंदर उदाहरण दिले आहे.

ववहारा सुह दुक्खं पुग्गलकम्मफ्फल पभुंजेदि । आदा णिच्छयणयदो चेदणभावं खु आदस्स ॥९॥

अर्थ  - व्यवहारनयाने आत्मा सुखःदुखरूप  पुद्‌गल कर्माच्या फळांचा भोक्ता आहे आणि निश्चयनयाने आपल्या चेतन भावाला भोगतो.

उक्त विवेचनावरून ग्रंथकार नेमिचंद्र मुक्त वस्तूस्वरूपाचे स्पष्टिकरण अनेकांत शैलीने करण्यात पारंगत असलेले दिसतात.

या ग्रंथावर पुढील टीका आढळतात -  १) बृहद्‌द्रव्यसंग्रह ग्रंथावर ब्रह्मदेव सूरीने लिहिलेली संस्कृतमध्ये बृहद् टीका आहे. ही टीका अत्यंत प्रामाणिक टीका मानली जात असून, नेमिचंद्राप्रमाणेच या टीकेत व्यवहार व निश्चयनयाद्वारे पदार्थाचे स्वरूप समजाऊन दिले आहे. २) द्यानतराय यांनी द्रव्यसंग्रहाचा छन्दोनुबध्द हिंदी अनुवाद केला आहे. ३) याशिवाय पं.जवाहरलालजीकृत हिंदी टीका असून रायसेन ग्रंथमाला मुंबईद्वारा प्रकाशित झाली आहे.

नेमिचंद्र आचार्यच्या वरील सर्व विवेचनावरून ते एक प्रगाढ पंडित असून जैनसिध्दांत साहित्यावर त्यांचे पूर्ण प्रभुत्व असल्याचे दिसते.  राजाश्रय मिळाल्यामुळे त्यांच्या या अंगच्या गुणांनी अधिकच वाव मिळालेला दिसतो.  तत्वजिज्ञासू लोकांसाठी व श्रावकांना यथार्थ धर्ममार्ग दाखिण्यासाठी त्यांनी अत्यंत

प्रयत्नाने ही महान ग्रंथरचना केली आहे. गुरूंना आदराने केलेला नमस्कार त्यांच्या विनयशीलतेचे प्रतीक आहे. तर आत्मविश्वासाने सिध्दांत साहित्याचे निरूपण करणे हे त्यांच्या प्रगल्भ बुध्दिचे ज्वलंत उदाहरण आहे आणि म्हणूनच त्यांची सिध्दांत चक्रवर्ती ही पदवी यथार्थ आहे असे वाटते.

**आ. स्वामिकार्तिकेय**

आ. स्वामिकार्तिकेय यांनी कार्तिकेयानुप्रेक्षा या महान ग्रंथाचीं रचना केली. हा एक विस्तृत, सरळ, सुंदर ग्रंथ असून अत्यंत मार्मिक आहे. या ग्रथात दिलेला उपदेश अत्यंत महत्वपूर्ण आह. सर्वजैन धार्मिकांच्याकडून प्रस्तुत ग्रंथाचे वाचन, मनन व पठण केले जाते. जिन भगवानद्वारा प्रतिपादित वस्तूरूपाची भावना प्रकट करण्यासाठी आणि चंचल मनाला आवरण्यासाठी स्वामी कुमारांनी या ग्रंथाची रचना केल्याचे, गाथा न.४८९ वरून स्पष्ट दिसते.

जिण वयणभवणट्ठं सामि कुमारेण परम सध्दाए l रइया अणुवेहाओ चंचलमण रूंभणट्ठ च ll

आ.कार्तिकेय साधारणपणे इ.स.८व्या शतकात होऊन गेल्याचे मानतात. अर्थात त्यांच्या कालाविषयी विद्वानात बराच मतभेद आहे. साधारणपणे कुंदकुंदाचार्यकृत बारस अणुवेक्खा आणि कार्तिकेयानुप्रेक्षा या दोन्ही ग्रंथात विषय व भाषा शैलीच्या दृष्टिने बरेचसे साम्य असल्याचे मानतात१. आचार्यानी आपल्या ग्रंथात अध्रुव, अशरण, संसार, एकत्व, अन्यत्व, अशुचि, आस्त्रव, संवर, निर्जरा, लोक, बोधिदुर्लभ आणि धर्म या १२ अनुप्रेक्षोचे अत्यंत मनोरम वर्णन केले आहे. जो या अनुप्रेक्षांचे वाचन, मनन, पठन करील, त्याला उत्तम सुखाची प्राप्ति होईल अशी इच्छा देखील त्यांनी प्रकट केली आहे.

आ.कार्तिकेय स्वामींच्या विशेष आणि निश्चित अशी माहिती अद्यापि उपलब्ध असल्याचे दिसत नाही. तर्क अथवा अनुमानाने ती एकत्रित करण्याचा प्रयत्न मात्र केलेला दिसतो. गाथा न.४८९ मध्ये आचार्यानी सामि कुमारेण असे म्हटले आहे, कुमार शब्दावरून ते आजन्म ब्रह्मचारी असावेत, हे सिध्द होते. याविषयीची आणखी विशेष माहिती, स्वामी कुमारांनी आपल्या कार्तिकेयानुप्रेक्षा ग्रंथातील शेवटच्या मंगलचरणातून स्पष्ट केल्याचे दिसते२.

तिहुवणपहाणसामि कुमारकाले वि तविय तवचरणं l वसुपुज्ज सुयं मल्लि चरम तिवेय सथुयं णिच्चं ll४९०ll

अर्थात तिन्ही लोकातील प्रमुख इंद्र, धरणेंद्र, चक्रवती इ. पार्श्वनाथ व जिन तीर्थकर ज्यांनी कुमार अवस्थेत तपाचरण केले, अशा वसुपूज्यसुत वासुपुज्य, मल्लिनाथ व नेमिनाथ, पार्श्वनाथ, महावीर या तीन तीर्थकरांचे स्तवन मी करतो.

चोवीस तीर्थकरात वासुपुज्य, मल्लिनाथ, नेमिनाथ, पार्श्वनाथ व महावीर ह्या पाच तीर्थकरांनी आपल्या कुमार अवस्थेतच दीक्षा घेतली होती. म्हणून हे पाचही जण बालब्रह्मचारी होते असे दिसते. ग्रंथकार स्वामी कार्तिकेय देखील ज्याअर्थी त्यांना अत्यंत आदराने नमस्कार व त्यांची स्तुति करतात, त्याअर्थी ते देखील बालब्रह्मचारी असावेत. कुमार शब्दावरून (गाथा नं ४८९) हे अधिक स्पष्ट होते. कुमार हे त्यांचे नाव असून स्वामी ही आदरार्थी उपाधि असावी.

कार्तिकेयानुप्रेक्षा या ग्रंथाचा नक्की कर्ता कोण असावा, याविषयी देखील बरीच मतमतांतरे आढळतात. स्वतः ग्रंथकर्त्याने सबंध ग्रंथात स्वतःचे नाव कार्तिकेय असल्याचे लिहिले नाही. बहुतेक ठिकाणी स्वामी कुमार अथवा स्वामी असाच उल्लेख केलेला आढळतो. कुमार अथवा कार्तिकेय हा शब्द पुत्र, बालक, राजकुमार, युवराज, अविवाहित, ब्रह्मचारी या स्वरूपात वापरलेला देखील आढळतो. कार्तिकेय ही हिंदूची देखील एक देवता मानली जाते. कार्तिकेय हा शिवाच्या वीर्यापासून अग्निदेवतेला प्राप्त झालेला पुत्र असून, त्याला ६ मुखे, १२ भुजा व ११ नेत्र असल्याचे मानले जाते. यालाच शिवपुत्र, गंगापुत्र, कृतिकापुत्र व कार्तिकेय या नावानी संबोधिले आहे, असे असताना स्वामिकार्तिकेय हेच या ग्रंथाचे कर्ते कसे मानावेत हा एक प्रश्नच आहे.

तरी सुध्दा प्रस्तूत प्रश्नाचे उत्तर आपणाला कांही इतर पुराव्यावरून मिळू शकते. कार्तिकेयानुप्रेक्षा ग्रंथावर भट्टारक शुभचंद्रांची एकमात्र संस्कृत टीका उपलब्ध असून, ती साधारणपणे विक्रम संवत १६१३ मध्ये समाप्त झाली असावी. या टीकेत स्वामि कार्तिकेय या नावाविषयी काही माहिती मिळू शकते.

स्वामिकार्तिकेयमुनिः क्रोचराजकृतोपसगं सोढ्वा साम्यपरिणमेण समाधिमरणेण देवलोकं प्राप्तः

प्रस्तूत ओळीतून शुभचंद्राने सर्वात प्रथम स्वामिकुमारांना स्वामिकार्तिकेयमुनि म्हटल्याचे दिसते. तसेच त्यांनी क्रौंचराजाचा उपसर्ग सहन करून, समाधिमरण स्वीकारले व ते देवलोकाला गेले, असाही उल्लेख केला आहे. परंतु या क्रौचराजाविषयी अपणाला कोठे विशेष माहिती मिळत नाही. त्यामुळे ग्रंथकर्त्याचा काळ ठरविणे देखील एक अवघड बाब होऊन बसली आहे.

भगवती आराधना या एका प्राचीन ग्रंथातील गाथा नं.१५५९ अनुसार क्रौंचराजाने उपसर्ग दिलेल्या एका व्यक्तीचा उल्लेख मात्र आला आहे. परंतु तेथे स्वामि कुमार अथवा कार्तिकेय हे नाव स्पष्ट नाही. मात्र त्यात आलेल्या अग्निदयितः या शब्दावरून अग्निप्रिय असणारा तो एवढाच अर्थ मिळतो.

रोहेडयम्मि सत्तीए हओ कोंचेण आग्गिदइदो वि ।  तं वेयणमाधियासिय पडिवण्णे उत्तमं अट्ठं ॥

पं.आशाधरजीने मुलाराधनादर्पण टीकेत अग्निदयिदो चा अर्थ अग्निराज पुत्रः कार्तिकेय असा दिला आहे. भगवती आराधनामधील उल्लेख असा आहे.

इतर काही ग्रंथातून स्वामिकुमार रोहिड नावांच्या नगरात शुध्द प्रासुक आहराच्या शोधार्थ असताना, क्षत्रियाने त्यांच्यावर शस्त्राचा प्रहार केला पुढे ते एकांतात गेले, आणि देहाचा त्याग करून उत्तम अवस्था प्राप्त केली असा उल्लेख मिळतो.

कार्तिकेय मुनीची एक कथा हरिषेण्, श्रीचंद्र आणि नेमिदत्ताच्या कथाकोषात मिळते.  या कथेत स्वामि कार्तिकेयाला कृतिका मातेपासून उत्पन्न अग्निराजाचा पुत्र असे म्हटले आहे. त्याचबरोबर कार्तिकेयाची बहिण क्रौंचराजाबरोबर विवाहबध्द झाली होती. या राजाच्या उपसर्गामुळेच कार्तिकेयाने राज्यकालात म्हणजेच कुमारावस्थेत मुनिदीक्षा घेतली असावी. पुढे अति उपसर्गामुळे देवलोकात ते विलीन झाले असावेत. थोडक्यात कार्तिकेय नावाचे कोणी एक स्वामी असून, त्यांना या राजाकडून उपसर्ग होत होता हे येथे सिध्द होते आणि या उपसर्गाला कंटाळून मनाला शांति मिळावी म्हणून त्यांनी कार्तिकेयानुप्रेक्षा ग्रंथाची रचना केली असावी.

**ग्रंथरचनेचा व कर्त्याचा काळ -**

स्वामि कार्तिकेयानुप्रेक्षा या ग्रंथाचा कर्ता कोण, हाच प्रश्न मुळी वादग्रस्त असल्यामुळे त्यांच्य ग्रंथरचनेत व त्यांच्या कुतीचा काळ ठरविणे अधिकच अवघड होऊन बसले आहे. विद्वानांच्या देखील या गोष्टीबाबत वरीच मतभिन्नता दिसून येते. याबाबत इतिहासवेत्ते पं.जुगलकिशोर मुख्तार व डॉ.ए.एन.उपाध्ये यांच्या मतांचा संक्षेपाने का होईना परामर्श घेणे अत्यावश्यक आहे.

पं.जुगलकिशोर यांच्या मते नेमिदत्ताच्या कथाकोषातील कार्तिकेय आणि भगवती आराधनामधील अग्निदयित ही दोन्ही पात्रे अथवा नावे एकच मानली तर कार्तिकेयानुप्रेक्षा ग्रंथ स्वामी कार्तिकेयानेच लिहिला असावा.  यावरून या ग्रंथ रचनेचा काळ भगवती आराधना तथा कुंदकुंद ग्रंथाच्या पूर्वीचा असावा.

परंतु जुगलकिशोर मुख्तार यांच्या या मताशी डॉ.ए.एन.उपाध्ये सहमत नाहीत. त्यांच्या मते स्वामी कार्तिकेय मुनींचा काळ इतका पाठीमागे जाऊ शकत नाही. कारण स्वामिकुमाररचित कार्तिकेयानुप्रेक्षा

ग्रंथातील अनुप्रेक्षांचा क्रम वट्टकेराच्या मूलाचराप्रमाणे, भगवती आराधनेप्रमाणे अथवा कुंदकुंदाच्या बारस अणुवेक्खा प्रमाणे नाही उलट हा क्रम आ.उमास्वातीच्या तत्वार्थसुत्र ्गंथाप्रमाणे आहे. याशिवाय स्वामी कुमाराच्या अनुप्रक्षा अपभ्रंश भाषेत नसून सुध्दा त्यातील २७९ गाथामध्ये णिसुणहि व भावहि हे अपभ्रंश शब्द सापडतात. शिवाय ही गाथा योगीन्दूच्या योगसारातील ६५ व्या गाथेला मिळतीजुळती आहे. अर्थात बऱ्याच गाथा परावर्तित करून घेतल्याच्या दिसतात. त्या योगीन्दूच्या योगसारातील असाव्यात असे दिसते. उदा. योगसार गाथा नं.६५ वर कार्तिकेयानुप्रेक्षा गाथा नं.३६९.

यावरून डॉ.ए.एन.उपाध्ये यांच्या मते कार्तिकेयानुप्रेक्षा हा ग्रंथ कुंदकुंदाच्या नंतरचाच नव्हे तर परमात्मप्रकाश व योगसार ग्रंथकर्ता योगेन्दूच्या नंतरचा असावा. म्हणजेच तो पुज्यपदांच्या समाधितंत्र ग्रंथाच्या नतरचा व चंछव्याकरणाच्या पूर्वीचा असावा. तो त्यांनी इ.स. ५ ते ७ शतकाच्या मध्यंतरास मानला आहे. अर्थात यावरून स्वामिकुमार त्याच काळात होऊन गेले आसावेत.

यावर पुनः जुगलकिशोर यांनी कार्तिकेयानुप्रेक्षा ग्रंथातील गाथा यथास्थित असून, स्वामिकुमाराने काही गाथा योगसारातील दोहे परावर्तित करून घेतल्या नाहीत, असे आपले मत स्पष्ट केले आहे. उलट योगीन्दूनेच भावपाहुड व समाधितंत्र पद्यावरून आपले दोहे तयार केले असावेत. यावरून स्वामिकुमाराचा हा ग्रंथ योगीन्दूच्या योगसार ग्रंथानंतर इ.स. ६व्या शतकानंतर लिहिला गेला नसावा. त्यांच्या मते कार्तिकेयानुप्रेक्षा हा ग्रंथ उमास्वातींच्या तत्त्वार्थसुत्र ग्रंथाच्या अधिक नंतरचा नसावा. त्यांच्याच आसपासच्या कालात या ग्रंथाची रचना झाली नसावी. म्हणूनच या ग्रंथाचे कर्ते अग्निपुत्र कार्तिकेय अथवा क्रौंचराजाद्वारा त्रस्त स्वामीकुमार नसून, स्वामिकुमार नावाचे एक स्वतंत्र आचार्यच असावेत.

भारतीय ज्ञानपीठ प्रकाशनाद्वारे प्रकाशित केलेल्या जैनेन्द्र कोश या ग्रंथात आ.स्वामिकुमार कार्तिकेय यांचा काल इ.स.१००८ इतका दिला आहे१.

वरील सर्व मतांचा परामर्श घेता कार्तिकेयानुप्रेक्षा ्ग्रंथाचे कर्ते, त्यांचा काल व त्यांची जीवनविषयक माहिती देणे थोडे कठीणच आहे. अगदी निर्णायक माहिती मिळेपर्यंत तरी या ग्रंथाचे कर्ते स्वामि कार्तिकेय असून त्यांचा रचना काल इ.स.५ ते ७ शतकाच्या दरम्यान मानावयास हरकत नसावी.

**ग्रंथरचना -**

आ.स्वामिकुमारांनी कार्तिकेयानुप्रेक्षा ग्रंथाशिवाय इतर कोणत्या ग्रंथाची रचना केली असल्याचा उल्लेख अथवा सबळ पुरावा मिळत नाही. स्वामी कार्तिकेय कार्तिकेयानुप्रेक्षा हीच एक ग्रंथरचना अत्यंत मौल्यवान समजली जाते. इकडे तिकडे चंचलतेने धावणाऱ्या मनाला मागे खेचून त्याला चिंतनात मग्न करण्यासाठी स्वामींनी या ग्रंथाची रचना केली आहे. प्रस्तूत ग्रंथात एकूण १२ अनुप्रेक्षांचे वर्णन ४८६ गाथांच्याद्वारे सांगितले आहे.

एखाद्या गोष्टीचे पुनः पुनः चिंतन करणे म्हणजे अनुप्रेक्षा होय. मोक्षमार्गात वैराग्य वृध्दिसाठी १२ प्रकारच्या अनुप्रेक्षा जैनागमात प्रसिध्द आहेत.या बारा प्रकारच्या तत्वांचे पुनःपुनः चिंतन करणे, हेच अनुप्रेक्षांचे सामन्य लक्षण आहे. अर्थात कर्म निर्जरेसाठी पूर्णरूपाने एकाग्रता साधून, श्रुतज्ञानाचे परिशीलन करणे म्हणजेच अनुप्रेक्षा होय२.

अनुप्रेक्षा शब्दाची फोड अन+प्र+ईक्ष अशी केली जाते. वारंवार केले जाणारे योग्य चिंतन म्हणजेच अनुप्रेक्षा होय. हे चिंतन अंतिम सत्याला धरून असल्याने मनातील विकार नष्ट होऊन, आत्म्यावरील श्रध्दा दृढ होते. अनुप्रेक्षा ला पर्यायी शब्द भावना असाही वापरला जातो.

आ.स्वामी कार्तिकेय यांनी एकूण १२ अनुप्रेक्षा पुढीलप्रमाणे सांगितल्या आहेत -
१ अनित्य २ अशरण ३ संसार ४ एकत्व ५ अन्यत्त्व ६ अशुचित्त्व ७ आस्त्रव ८ संवर ९ निर्जरा १० लोक ११ बोधिदुर्लभ १२ धर्म.

**१. अनित्यानुप्रेक्षा** - हिलाच अध्रुवानुप्रेक्षा असेही म्हटले आहे. ह्या जगात शाश्वत काही नाही. सर्व वस्तु चंचल, अशाश्वत आहेत. शरीर सौंदर्य वाढविण्यासाठी बऱ्यावाईट मार्गाने संपती गोळा करणे, त्यासाठी वाईट कर्मे करणे, योग्य नाही. कारण अशा कर्मापासून मिळणारे बरे वाईट फळ भोगल्याशिवाय जीवाची सुटका होत नाही. तारूण्य, संपती इ. पाण्यावरील बुडबुडयाप्रमाणे आहे. तारूण्य म्हातारपणाशी निगडीत आहे. तर जीवन मृत्युशी निगडीत आहे. बांधवांची सोबत केवळ वाटसरूप्रामणे असते. अर्थात जीवनातील ह्या सर्व हव्याहव्याशा वाटणाऱ्या वस्तु क्षणभंगूर आहेत. म्हणून संपत्तीचे सत्पात्री दान करावे. अर्थात अनित्यानुप्रेक्षेचे हे लक्षण जाणून क्षणभंगुर सुखच्या मोहात गुरफटुन जाऊ नये. म्हणून आत्महिताकरिता नेहमी धर्माचरणात मग्न राहावे आणि अनित्य भावनेचे सतत मनन करावे. थोडक्यात या संसारात सर्व काही अनित्य आहे, असे समजून चिंतन करणे, म्हणजेच अनित्यानुप्रेक्षा अथवा अध्रुवानुप्रेक्षा होय.

**२. अशरणानुप्रेक्षा** - संसारात जीवाचे कोणतेच शरणस्थान नाही हे जाणून, चिंतन करणे म्हणजेच अशरणानुप्रेक्षा होय. संसारात एक आत्मा सोडला, तर बाकी सर्व अनित्य व क्षणभंगूर आहे. महान वैभवशाली

देवेंद्र असोत की, ब्रम्हा, विष्णू, महेशसारखे महान देव असोत, या सर्वांना कृतांत काळाने ग्रासले आहे. जीवाची स्थिती सिंहाच्या जबडयात सापडलेलया हरिणासारखी आहे. देवेंद्रही जीवाचे आयुष्य वाढवीत नाहीत. अथवा भूत,पिशाच्च, याक्षादि त्योच रक्षण करीत नाहीत. ज्यावेळी जीव असा निराधार होतो,त्यावेळी सम्यग्दर्शन ज्ञान चरित्र हाच एक मोक्षाचा मार्ग त्याला आधारभूत असतो. सतधर्माला शरण जाण्यावाचून गत्यंतर नाही.

३. **अन्यत्त्वानुप्रेक्षा** - आत्मा हा एकटाच आपल्या शुभाशुभ कर्माचा कर्ता व भोक्ता आहे. आत्म्यापासून अन्य ते परके, असे मानणे म्हणजेच अन्यत्व अनुप्रेक्षा होय. खरे म्हणजे कुटुंबातील आई,वडील, भाऊ, बहिण, पत्न, पुत्र वगैरे मिथ्यात्त्वामुळे आपलीशी वाटतात. खरे पाहता ती परकी आहेत. कारण अंतसमयी त्यांच्यापैकी कोणही मदत करून शकत नाही. व्यवहाराने ही सर्व नाती आपणाला जवळची वाटतातत्र परंतू निश्चयनयाने सगळे जीव वेगळे आहेत. म्हणून या संसारात स्वत:शिवाय अन्य कोणी आधार देणारे नाहीत, हे जाणून आत्मशुध्दीला योग्य अशा रत्नत्रय मार्गाचा अवलंब करावा.

४. **संसारानुप्रेक्षा -** संसार ५ प्रकारचा आहे - १ द्रव्यसंसार, २ क्षेत्र संसार, ३ कालसंसार, ४ भवसंसार, ५ भावसंसार.

जीवाचे एका भवातून दुसऱ्या भवात भ्रमण म्हणजेच संसार होय. कर्मद्रव्या परिवर्तन व नोकर्मद्रव्य परिवर्तन म्हणजेच द्रव्यसंसार होय, समस्त लोकाकाशातील जो प्रदेश, जेथे अनेक जीवांचा जन्म-मरणचा फेरा चालू असतो, तो क्षेत्र संसार,. अवसर्पिणी व उत्सर्पिणी कालाच्या प्रथम समयापासून ते शेवटच्या समयापर्यंत सर्व कालामध्ये जीव क्रमश: जन्मतो व मरतो तो काल संसार. संसारी जीव नरक इ. चार गतीतील स्थितीपासून उत्कृष्ठ स्थितिपर्यत सर्व गतीत जन्मतो त्याला भवसंसार म्हणतात. जीव अष्टकर्माची जी स्थिती भोगत असतो. त्याला भावसंसार असे म्हणतात.

५. **एकत्त्वानुप्रेक्षा** - ह्या संसारी अवस्थेत सर्व अनित्य आहे, आश्रय ठिकाण कोणतेच नाही. कषायवश होऊन जीव चतुर्गतीत सारखा भटकत असतो. मिथ्यात्त्वामुळे आपले शरीर आपलेसे वाटते. घरातील आई, वडील, भाऊ, बहिणी, पति, पत्नी, मुले आपलीशी वाटतात. परंतू एका जीवाचा दुसऱ्या जीवाशी संबंध नसतो. जीव गर्भामध्ये जन्म घेतो, देह धारण करतो, अनुक्रमे बालपण, तारूण्य वृध्दावस्था प्राप्त करून घेतो. त्याला रोग होतो त्याबद्दल शोक करतो आणि बिचारा एकटाच केलेल्या शुभाशुभ कर्मानुसार सुख दुख भोगीत राहतो. ज्यांच्यासाठी सुख दुःख भोगतो, ती कुटुंबातील माणसे त्याच्या दुःखाचा वाटा उचलत नाहीत. एकटाच सर्व सहन करतो. आत्मप्रगतीसाठी एकटाच पुण्यसंचय करीत राहतो. तो एकटाच स्वर्गसुख भोगतो. एकटाच कर्मक्षय करतो. कर्मक्षय केलेला तो एकटाच सिध्दगति प्राप्त करून घेतो. ह्या एकटेपणाच्या भावनेचे चिंतन करणे म्हणजेच एकत्त्वानुप्रेक्षा होय.

**६. अशुचित्त्वानुप्रेक्षा** - अपवित्र शरीर भावनेला अशुचित्त्व असे म्हणतात. शरीराच्या अपवित्रतेविषयी चिंतन करणाऱ्या अशुचित्त्वानुप्रेक्षा असे म्हणतात. शरीराची निर्मिती, अस्तित्त्व व विनाश ही सारी अशुभकारक आहेत. हे शरीर रक्त, मास, हाडे, कातडे, घाम, मलमूत्र, रोग इत्यादींनी युक्त आहे, असे चिंतन करण म्हणजेच अशुचित्त्वानुप्रेक्षा होय.

**७. आस्त्रवानुप्रेक्षा** - कर्माच्या आस्त्रवाचे चिंतन करण्याला आस्त्रव अनुप्रेक्षा म्हणतात. कर्माच्या उदयाने मन, वचन, काययुक्त,जीवाची जी शक्ति कर्माच्या येण्याला कारणीभूत होते, तिला आस्त्रव असे म्हणतात. योगालाही आस्त्रव म्हणतात. योग मन, वचन, काय अशा तीन प्रकारचा आहे. शुभाशुभ कर्मानुसार आस्त्रवाचे पुण्यकारक व पापकारक असे दोन प्रकार आहेत. पुण्यास्त्रव देखील आत्म्याची उन्नती होऊ देत नाही. आस्त्रव हा आत्म्याचे कल्याण करणारा नाही, हे जाणून चिंतन करणे म्हणजेच आस्त्रव अनुप्रेक्षा होय.

**८. संवरानुप्रेक्षा** - कर्मास्त्रव थांबविण्याच्या क्रियेला संवर असे म्हणतात. त्या क्रियेचे चिंतन करण्यालाच संवरानुप्रेक्षा म्हणतात. संवरामुळे नवीन कर्मबंध होत नाही. म्हणून संवर तत्वाचे चिंतन करावे. हीच संवरानुप्रेक्षा जाणावी

**९. निर्जरानुप्रेक्षा** - पूर्वबध्द कर्मवर्गणेचे आत्मप्रदेशापासून वेगळे होणे अथवा कर्माचा काही अंशाने क्षय होण्याचा क्रियेलाच निर्जरा असे म्हणतत. निर्जरा तत्त्वाचे चिंतन करण्यालाच निर्जरानुप्रेक्षा असे म्हणतत. संचित झालेल्या व होत असलेल्या कर्मबंधनापासून आत्म्याला शुध्द ठेवणे त्यासाठीच निर्जरानुप्रेक्षेची आवश्यकता असते.

**१०. लोकानुप्रेक्षा** - जेथे जीव इ.राहतात त्या राहाण्याच्या ठिकाणाला लोक असे म्हणतात. आकाश अनंत प्रदेशी असून, लोक त्यात स्थित आहे. हा लोक कोणी निर्माण केला नाही अथवा त्याला कोणी आधार दिला नाही. आकाशाचे लोकाकाश व अलोकाकाश हे दोन भेद आहेत. त्याचे क्षेत्र ७ राजू घन आहे. लोकाला घनोदघी, घनवात, तनुवात यांनी वेढले आहे. लोकाचे अधो, मध्य, उर्ध्व असे तीन भाग आहेत. लोकाकाशाच्या अग्रभागी सिध्द शिला असून, त्यावर संसारमुक्त झालेले सिध्दगण विराजमान होतात. अधोलोककाशात ७ नरक असून मध्यभागात २।। द्वीप आहेत. उर्ध्वलोकात १६ स्वर्ग आहेत. तेथे देव राहतात. जीवाच्या शुभाशुभ कर्मानुसार त्याला देव, मनुष्य, तिर्यच अथवा नारकी गति प्राप्त होते. लोकाकाशाच्या बाहेरील भागास अलोकाकाश असे म्हणतात. तेथे पोकळी असून जीव, धर्म, अधर्म , काल ही तत्त्वे तेथे नसतात. लोकाकाशाचे स्वरूप सांगताना स्वामी कुमारांनी ज्ञानाचे विविध प्रकारही कथन केले आहे.

जो शांतपणे लोकाकाशाच्या स्वरूपाविषयी एकाग्र चित्ताने चिंतन करतो, तो राहिलेल्या सर्वच कर्माचा क्षय करून त्रैलोक्याला शिरोमणीप्रमाणे पूजनीय होतो.

**११. बोधिदुर्लभानुप्रेक्षा** - केवल्य म्हणजे बोधि. ज्ञानप्राप्ती मोठ्या कष्टाने प्राप्त होते. तरीसुध्दा ते पुनः दुर्लभ असते. या दुर्लभत्वाचे चिंतन करणे म्हणजेच बोधिदुर्लभानूप्रेक्षा होय. जीव सदैव भ्रमण करतो. तो बराचकाळ निगोदामध्ये` राहतो. तेथून पूढे अनूक्रमे पृथ्वीकाय, त्रसकाय, नारकी, तिर्यच, मनुष्य, देव इ.

गतीतून जातो. मुनष्य भव प्राप्त झाल्यावर देखील निरोगी, दीर्घायुषी, संपत्तीयुक्त होणे कठीण असनू सम्यकदर्शन, चारित्र, व ज्ञान याची त्याला प्राप्ति होत नाही. समुद्रात पडलेले रत्न ज्याप्रमाणे सापडणे कठीण त्याप्रमाणे जीवाला मनुष्य जन्म मिळणे अत्यंत दुर्लभ आहे. मुनष्य जन्म प्राप्त झाला तरी विषयादी सुखात लालूप बनून तो व्रतादिंचे पालन करीत नाही. साक्षात हातावरील अमृत नष्ट व्हावे तसा मुनष्यजन्म इष्टफळ वाया घालवितो. म्हणून संसारात सम्यग्दर्शन, ज्ञान, चारित्र, यांनी युक्त अशा मोक्षमार्गाने अनुकरण करावे.

**१२. धर्मानुप्रेक्षा** - धृ म्हणजे धारण करणे, प्रत्येक वस्तु कोणत्या ना कोणत्या गुणांची धारक असते. उदा- अग्नी उष्णतेचा, बर्फ थंडीचा धारक असतो. तसा जीव चेतना गुणाचा धारक असतो. खरे म्हणजे जीवांना सांसारिक दु:खातून मुक्त करून, अविनाशी अशा सुखाप्रत नेतो त्यालाच धर्म असे म्हणतात. अशा भावनेचे चिंतन करणे म्हणजेच धर्मानुप्रेक्षा होय. अर्थात जीवाचा विकास अथवा उन्नती ही धर्मानेच होते. खरी सुखप्राप्ती धर्मानेच मिळते. हे जाणून भोग व अज्ञान यांच्या पासून दूर राहून आत्मकल्याणाचा मार्ग दाखविणाऱ्या धर्म भावनेचे चिंतन करावे. या चिंतनासच धर्मानुप्रेक्षा असे म्हटले आहे.

खरोखर या १२ अनुप्रेक्षा अशांत, अस्थिर आणि अविवेकी मनाला शांत व निर्मळ बनवितात. त्यांच्या चिंतनाने मनाची चिंतनशक्ति वृध्दिंगत होते व आत्मविकासाचा मार्ग मोकळा होतो. एवढेच नव्हे तर स्वामिकूमारोच्या मते त्याला शाश्वत सुख मिळते.

बारस अणुवेक्खाओ भणिया हु जिणगमाणुसारेण । जो पढइ भावइ सो पावइ सासयं सोक्खं ॥

आ.स्वामी कार्तिकेय यांनी कार्तिकेयानुप्रेक्षा हा ग्रंथ जैन शौरसेनी भाषेत लिहिला असून, तो अत्यंत मर्मस्पर्शी आहे. भाषाशैली अत्यंत साधी, सोपी, सरळ प्रवाही व सुलभ अशी आहे. विविध अनुप्रेक्षातून दिलेली विविध उदाहरणे मनाला आकर्षूण घेतात. स्वत:विषयी माहिती न देण्यात स्वामिकुमारांचा विनयशीलपणा व प्रसिध्दी पराङमुखता हे दोन गुण प्रकट होतात. आचार्याच्या नावाविषयी व कालाविषयी मतभिन्नता असली तरी या ग्रंथातील विषय मोठा महान आहे. अवखळ वासराप्रमाणे संसारात धावणारे मन कोणत्या तरी भावनेत गुंतवून टाकावे, आत्म्याचे चिंतन करून आत्म्याची शुध्दी करून घ्यावी व उत्तमावस्था प्राप्त करावी हा महान उपदेश या ग्रंथातून त्यांनी दिला आहे.

स्वामिकार्तिकेयानुप्रेक्षा हा जैन साहित्यातील ग्रंथ म्हणजे एक अमुल्य रत्न होय. हे रत्न जवळ बाळगून अर्थात या ग्रंथाचे मनन, श्रवण, पठन करून त्याचा जास्तीत जास्त लाभ घेणे हे श्रावक-श्राविका यांचे महान कर्तव्य आहे. आत्मचिंतनामुळेच आत्म्याची खरी प्रगती होते व त्याला उत्तमावस्था प्राप्त होते. हेच पुन: पुन: या ग्रंथात सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

रस आणि अलंकार या विषयाचे विवेचन करण्यासाठी त्यांनी 'काव्यानुशासन' हा ग्रंथ लिहिला. या ग्रंथावर 'अलंकार चूडामणी' व 'अलंकार-वृत्ति-विवेक' हे दोन टीका ग्रंथ उपलब्ध आहेत. छंदशासत्रासाठी 'छंदानुशासन नावाचा ग्रंथ हेमचंद्रांनी लिहीला. या ग्रंथात संस्कृत व प्राकृत या दोन्ही भाषांच्या छंदांचे उदाहरणांच्या साह्याने विवेचन केले आहे.

न्याय विषयाचा 'प्रमाण मीमांसा' नावाचा ग्रंथ त्यांनी लिहीला. तो अपूर्ण आहे. त्यांच्या न्यायविषयक बत्तीशीमध्ये 'अन्ययोगव्यवच्छेदक' व 'अयोगव्यवच्छेदक' हे दोन ग्रंथ आढळतात. दोन्ही ग्रंथात प्रसाद गुणसंपन्न ३२-३२ श्लोक आहेत.या ग्रंथामध्ये भ. महावीरांच्या स्तुतीरुपाने षड्दर्शनांच्या मान्यतांचे विश्लेषण केले आहे. श्लोकाची रचना महाकवि कालिदास व स्वामी शंकरार्चांच्या रचनाशैलीचे स्मरण करविते. 'अन्ययोगव्यवच्छेदक' बत्तीशीवर मल्लिषेण सूरींनी 'स्याद्वाद मंजरी' नावाचा प्रसादगुण संपन्न ग्रंथ लिहीला आहे. त्यात विविध व उचित उदाहरणांच्या साह्याने परमताचे खंडन व स्वमताचे प्रदिपादन केले आहे. या व्याख्या ग्रंथावरुन हेमचंद्रांच्या मूळच्या श्लोकांची गंभीरता, उच्चता व अर्थपूर्णता आपल्या लक्षात येते.

आध्यात्मिक विषयात आ. हेमचंद्रांनी 'योगशास्त्र' किंवा 'अध्यात्मोपनिषद' हा ग्रंथ लिहीला. हा ग्रंथ १२०० श्लोकांचा आहे. या ग्रंथावर १२००० श्लोक प्रमाण सोपज्ञ टीका उपलब्ध आहे.

स्तोत्र ग्रंथामध्ये 'वीतराग स्तोत्र' व 'महादेव स्तोत्र' हे ग्रंथ लिहीले आहेत. त्यांची स्तुती केली आहे.

चरित्र साहित्याच्या दृष्टीने 'त्रिषष्टि शलाका पुरुष' तथा 'परिशिष्ठ पर्व' ग्रंथ लिहीले. हे ग्रंथ कथात्मक स्वरुपाचे आहेत. या ग्रंथाची कथावस्तूच्या दृष्टीने अत्यंत उपयोगिता आहे. तसेच इतिहासाची गूढ तत्वे देखील या ग्रंथात आढळून येतात.

आ. हेमचंद्रांनी या विविध प्रकारच्या ग्रंथलेखनाच्या साह्याने जन साहित्य समृध्द केले. साहित्याच्या प्रत्येक अंगाशी निगडीत असलेली त्यांची लेखणी पाहून तसेच दूरदर्शिता, व्यवहारदक्षता इ. पाहून विद्वानांनी त्यांना 'कलिकाल सर्वज्ञ' या उपाधीने विभूषित केले, तर पीटर्सन वगैरे पाश्चिमात्य विद्वानांनी त्यांना 'ज्ञानाचा महासागर' ही सार्थ व समर्पक उपमा दिली. आ. हेमचंद्र कालाचे एक प्रतिभाशाली विद्वान होते. त्यांनी जैन सिध्दांताचे गंभीर अध्ययन करीत असतानाच इतर दार्शनिक ग्रंथाचाही अभ्यास केलेला दिसतो.

**भाषाशैली -**

आचार्य हेमचंद्रांनी साहित्याचा विविध अंगाचे परिपूर्ण अध्ययन केले होते. यात काहीच शंका नाही. त्यांच्या विषय वर्णनाची शैली सुस्पष्ट, प्रसाद गुणांनी युक्त असून ह्दयस्पर्शी आहे. न्याय, दर्शन इत्यादी कठीण विषयांनी अत्यंत सरळ, ह्दयग्राही भाषेत रचना करुन वाचकांना मंत्रमुग्ध करुन सोडण्याची हेमचंद्रांची एक वेगळीच कला आहे.

जैनेतर साहित्यातही अहिंसेचे महत्व स्पष्ट केले आहे, यावर त्यांचा दृढ विश्वास आहे. त्यामुळे भगवान महावीरांचा उपदेश हाच शेवटी सर्वोत्कृष्ट व कल्याणकारी स्वरुपाचे त्यांनी वेळोवेळी सांगितले आहे. हितावह व सुखकारक अशा जिनशासनाच्या उपदेशाची उपेक्षा करणारे लोक दुष्ट प्रवृत्तीचे असल्याचे त्यांनी निक्षून सांगितले आहे. वीतरागाशिवाय दुसरा देव नाही व अनेकान्त वादासारखा दुसरा न्यायमार्ग नाही हे त्यांनी खालील श्लोकावरुन स्पष्ट केले आहे-

इमां समक्षं प्रतिपक्ष साक्षिणामुदारघोषामवघोषणां ब्रुवे ।
न वीतरागात्परमस्ति दैवतं न चाटयनेकान्तमृते नयस्थितिः ॥

जिनदर्शनाविषयी पक्षपात व जिनेतर दर्शनाविषयी द्वेष भावना न ठेवता जिनशासनाचे मोठेपण ते सुंदररीत्या प्रकट करतात-

न श्रध्दयैव त्वयि पक्षपाती न द्वेषमात्रादरुचिः परेषु ।
यथावदातत्वपरिक्षया तु त्वामेय वरि प्रभुमश्रिताः स्मः ॥

अर्थात हेमचंद्रांचार्यांचा जिनशासनाविषयी तर अत्यंत आदर वाटतो. त्याचबरोबर ते इतर दार्शनिकाविषयी द्वेष न बाळगता स्वमताचे योग्य प्रतिपालन करीत होते.

आ. हेमचंद्रांनी ८४ वर्षापर्यंत आजन्म ब्रम्हचर्य व्रताचे पालन केले. जवळ जवळ दीड लक्ष व्यक्तींना उपदेशाच्या साह्याने जैन धर्माचा स्वीकार करावयास लावला. विविध साहित्याची निर्मिती करणाऱ्या या महान विद्वानाचा संवत १२२९ मध्ये स्वर्गवास झाला. त्यांचे अनेक शिष्य होते. श्रीरामचंद्र आदि सात शिष्य विशेष प्रख्यात आहेत. संस्कृत-प्राकृत-अपभ्रंश या तिन्ही भाषांवर पूर्ण प्रभुत्व असणारा, साहित्याच्या सर्वांगाची व्यवस्थितरीत्या रचना करणारा, गूढ सिध्दांताचे सरळा, सुलभ व स्पष्टपणे स्पष्टीकरण करणारा, मान्यता पावलेला आ. हेमचंद्रासारखा तत्कालीन दुसरा विद्वान मिळणे दुर्मिळच.

## कालानुक्रमे आचार्यांची यादी

**इसवी सनपूर्व**

| अ.नं. | काल (इ. स.) | नाव | गुरु तथा संघ | विशेष |
|---|---|---|---|---|
| १ | ५२७-५१५ | गौतमगणधर | श्रुतावतार | केवली |
| २ | ५१५-५०३ | सुधर्माचार्य | श्रुतावतार | केवली |
| ३ | ५०३-४६५ | जंबू स्वामी | श्रुतावतार | केवली |
| ४ | ४६५ | श्रीधर | क्रमबाह्य | केवली |
| ५ | ४६५-४५१ | विष्णुनंदि | श्रुतावतार | श्रुतकेवली |
| ६ | ४५१-४३५ | नंदिमित्र | श्रुतावतार | श्रुतकेवली |
| ७ | ४३५-४१३ | अपराजित | श्रुतावतार | श्रुतकेवली |
| ८ | ४१३-३९४ | गोवर्धन | श्रुतावतार | श्रुतकेवली |
| ९ | ३९४-३६५ | भद्रबाहू (नं. १) | श्रुतावतार | श्रुतकेवली |
| १० | ३९४-२९८ | स्थूलीभद्र | श्रुतावतार | श्वेतांबर संघ निर्माते |
| ११ | ३६५-३५५ | विशाखाचार्य | श्रुतावतार | ११ अंगधारी व दशपूर्वधारी |
| १२ | ३५५-३३६ | प्रोष्ठिल | श्रुतावतार | ११ अंगधारी व दशपूर्वधारी |
| १३ | ३३६-३१९ | क्षत्रिय | श्रुतावतार | ११ अंगधारी व दशपूर्वधारी |
| १४ | ३१९-२९८ | जयसेन (नं. १) | श्रुतावतार | ११ अंगधारी व दशपूर्वधारी |
| १५ | २९८-२८० | नागसेन | श्रुतावतार | ११ अंगधारी व दशपूर्वधारी |
| १६ | २८०-२६३ | सिध्दार्थ | श्रुतावतार | ११ अंगधारी व दशपूर्वधारी |
| १७ | २६३-२४५ | धृतिसेन | श्रुतावतार | ११ अंगधारी व दशपूर्वधारी |
| १८ | २४५-२३२ | विजयसेन | श्रुतावतार | ११ अंगधारी व दशपूर्वधारी |
| १९ | २३२-२१२ | बुध्दिल | श्रुतावतार | ११ अंगधारी व दशपूर्वधारी |
| २० | २१२-१९८ | गंगदेव | श्रुतावतार | ११ अंगधारी व दशपूर्वधारी |
| २१ | १९८-१८२ | धर्मसेन | श्रुतावतार | ११ अंगधारी व दशपूर्वधारी |
| २२ | १८२-१६४ | नक्षत्र | श्रुतावतार | ११ अंगधारी |
| २३ | १६४-१४४ | जयपाल | श्रुतावतार | ११ अंगधारी |
| २४ | १४४-१०५ | पांडु | श्रुतावतार | ११ अंगधारी |
| २५ | १०५-९१ | ध्रुवसेन | श्रुतावतार | ११ अंगधारी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २६ | ९१-५६ | कंसाचार्य | श्रुतावतार | ११ अंगधारी |
| २७ | ५६-५३ | सुभद्र | श्रुतावतार | ११ अंगधारी |
| २८ | ५३-३५ | यशोभद्र | श्रुतावतार | ११ अंगधारी |
| २९ | ३५-१२ | भद्रबाहु (नं. २) | श्रुतावतार | ११ अंगधारी |
| ३० | इ.स.पूर्व १२ ते इ.स. ३८ | लोहाचार्य | श्रुतावतार | ०८ अंगधारी |
| ३१ | इ.स. पूर्व २० ते २० | कुमार | | |

**इसवी सन शतक १**

| अ.नं. | काल (इ. स.) | नाव | गुरु तथा संघ | प्रमुख रचना |
|---|---|---|---|---|
| ३२ | शतकारंभी | चंद्रनंदि | | |
| ३३ | शतक १ चा पूर्व | बलदेवसूरी | चंद्रनंदी | |
| ३४ | शतक १ चा पूर्व | जिननंदी | | |
| ३५ | शतक १ चा पूर्व | मित्रनंदी | | |
| ३६ | शतक १ चा पूर्व | सर्व गुप्त | | |
| ३७ | शतक १ चा मध्य | शिवकोटी | जिननंदी, मित्रनंदी व | भगवती आराधना सार |
| ३८ | शतक १ चा मध्य | कार्तिकेय | | |
| ३९ | इ. स. ३ | विनयधर | पुन्नाटसंघ | |
| ४० | इ. स. १३ | गुप्तिश्रुति | पुन्नाटसंघ | |
| ४१ | इ. स. २३ | गुप्तिऋध्दि | पुन्नाटसंघ | |
| ४२ | इ. स. ३३ | शिवगुप्ति | पुन्नाटसंघ | |
| ४३ | ३८ ते ५८ | विनयदत्त | श्रुतावतार | |
| ४४ | ३८ ते ५८ | श्रीदत्त | श्रुतावतार | |
| ४५ | ३८ ते ५८ | शिवदत्त | श्रुतावतार | |
| ४६ | ३८ ते ५८ | अर्हदत्त | श्रुतावतार | |
| ४७ | ३८-६६ | अर्हद्वलि | श्रुतावतार | अंगधारी |
| ४८ | ३८-७३ | माघनंदि | श्रुतावतार | अंगधारी |
| ४९ | ३३-६६ | धरसेन | श्रुतावतार | अंगधारी |
| ५० | ६६-१०१ | पुष्पदंत | श्रुतावतार | अंगधारी |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५१ | ६६-१५६ | भूतबली | श्रुतावतार | षट्खंडागम |
| ५२ | इ. स. ५३ | मंदारार्य | पुन्नाट संघ | अंगधारी |
| ५३ | इ. स. ६३ | मित्रवर्य | पुन्नाट संघ | अंगधारी |
| ५४ | ५७-१५६ | गुणधर | पुन्नाट संघ | कषायपाहुड |

**इसवी सन शतक २**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५५ | १०४-१११४ | गुप्तिगुप्ति | नंदिसंघ बलात्कार | |
| ५६ | ११४-११८ | माघनंदि | नंदिसंघ बलात्कार | |
| ५७ | ११८-१२७ | जिनचंद्र | नंदिसंघ बलात्कार | |
| ५८ | १२७-१७६ | पद्मनंदि (कुंदकुंद) | नंदिसंघ बलात्कार | समयसार, रयणसार, पंचास्तिकाय |
| ५९ | १७६-२२० | उमास्वामी | नंदिसंघ बलात्कार | तत्त्वार्थसूत्र |
| ६० | इ.स. शतक २ चा उत्तरार्ध | समंतभद्र | मूलसंघ विभाजन उमास्वामि अन्वय | गंधहस्ती महाभाष्य |

**इसवी सन शतक ३**

| अ.नं. | काल (इ. स.) | नाव | गुरु तथा संघ | विशेष |
|---|---|---|---|---|
| ६१ | शतकारंभी | श्यामकुंद | | षट् खंडागम टीका |
| ६२ | २२०-२३१ | लोहाचार्य (नं. ३) | नंदिसंघ बलात्कार | |
| ६३ | २२०-२३१ | बलाकपिच्छ | उमास्वामी | |
| ६४ | २३१-२९९ | यशःकीर्ति | नंदिसंघ बलात्कार | |
| ६५ | २९९-३३६ | यशोनंदी | नंदिसंघ बलात्कार | |
| ६६ | इ. स. ३ ते ५ | वादिराज | समंत भद्रान्वय | |
| ६७ | इ. स. ३ ते ४ | तुम्बुलूर | | |

**इसवी सन शतक ४**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ६८ | ३३६-३८६ | देवनंदी | नंदिसंघ बलात्कार | |
| ६९ | ३५७- | मल्लधारि (नं. १) | | नयचक्र प्रथम |
| ७० | ३६६- | धर्मसने (नं. २) | | |
| ७१ | ३८२- | सुमति | | |
| ७२ | ३८६-४३६ | जयनंदी | नंदिसंघ बलात्कार | |

**इसवी सन शतक ५**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ७३ | इ. स. ५ | श्रीदत्त (नं २) | पूज्यपाद पूर्ववर्ती | |
| ७४ | इ. स. ५ | यशोभद्र | पूज्यपाद पूर्ववर्ती | |
| ७५ | इ. स. ५ | पूज्यपाद | मूलसंघ विभाजन | सर्वार्थसिध्दि |
| ७६ | ४३७ | अपराजित (नं. २) | | |
| ७७ | ४३६-४४२ | गुणनंदी | नंदिसंघ | |
| ७८ | ४४२-४६४ | वज्रनंदी | नंदिसंघ | |
| ७९ | ४६४-५०५ | कुमारनंदी | नंदिसंघ | |
| ८० | ४५५-५४५ | आर्यमंक्षु | नंदिसंघ | |
| ८१ | ४७०-५६० | नागहस्ती | आर्यमक्षु | |
| ८२ | ४५३ | देवर्धि | श्वेतांबराचार्य | आचारांगादि |
| ८३ | ४५८ | सर्वनंदी | | लोकविभाग |
| ८४ | ४६९ | वज्रनंदी (नं. २) | पूज्यपाद | द्रविड संघ प्रवर्तक |
| ८५ | ४७८-५१३ | पूज्यपाद (नं. २) | | |
| ८६ | ४८०-५८० | हरिभद्रसूरि | श्वेतांबराचार्य | षट्दर्शन समुच्चय |

**इसवी सन शतक ६**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ८७ | इ. स. ६ | योगेन्द्र देव | | परमात्म प्रकाश |
| ८८ | इ. स. ६ | प्रभाकर भट्ट | योगेन्द्रदेव | |
| ८९ | ५०५-५३१ | लोकचंद्र | नंदिसंघ बलात्कार | |
| ९० | ५३१-५५६ | प्रभाचंद्र (नं. १) | नंदिसंघ बलात्कार | |
| ९१ | ५५६-५६५ | नेमिचंद्र (नं. १) | नंदिसंघ बलात्कार | |
| ९२ | ५६५-५८६ | भानुनंदी | नंदिसंघ बलात्कार | |
| ९३ | ५८६-६०३ | सिंहनंदी | नंदिसंघ बलात्कार | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९४ | ५४०-६०९ | यतिवृषभ | नागहस्ती | कषायपाहूड |

पान नं. २३० वरुन

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ९५ | ५५० | सिध्दसेन दिवाकर | श्तेतांबराचार्य | सन्मतिसूत्र |
| ९६ | ५६३-६०३ | इंद्रसेन | सेनसंघ | |
| ९७ | ५८६-६२३ | दिवाकरसेन | सेनसंघ | |
| ९८ | ६०० | कीर्तिधर | | रामकथा |
| ९९ | इ. स. ६-७ | पात्रकेसरी (नं. २) | | त्रिलक्षण कदर्थन |
| १०० | इ. स. ६ ते ११ | अपराजित | | भ. आराधनावरील विजयोदया टीका |

**इसवी सन शतक ७**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १०१ | इ. स. ७ | जयसिंहनंदी | | |
| १०२ | ६०३-६४३ | अर्हत्सेन | सेनसंघ | |
| १०३ | ६२३-६६२ | लक्ष्मणसेन | सेनसंघ | |
| १०४ | ६०९ | जिनभद्रगणि | श्वेतांबराचार्य | विशेषावश्यकभाष्य |
| १०५ | ६२५ | कनकसेन | | |
| १०६ | ६०३-६०९ | वसुनंदी (नं. १) | नंदीसंघ बलात्कारगण | |
| १०७ | ६०९-६३९ | वीरनंदी (नं. १) | नंदीसंघ बलात्कारगण | |
| १०८ | ६३९-६६३ | रत्ननंदी | | |
| १०९ | ६६३-६७६ | माणिक्यनंदी (नं. १) | नंदीसंघ बलात्कारगण | |
| ११० | ६७९-७०५ | मेघचंद्र | नंदीसंघ बलात्कारगण | |
| १११ | ६५० | बलदेव (नं. २) | कनकसेन | |
| ११२ | ६३८-६८८ | मेघचंद्र (नं. २) | | |
| ११३ | ६६०-६८० | अकलंकभट्ट | | राजवार्तिक |
| ११४ | ६४३-६८३ | रविषेण | सेनसंघ | पद्मपुराण |
| ११५ | ६४४-७७८ | विमलसूरि | राहू | पउमचरिउ |
| ११६ | ६६५-७०५ | महोदेव भट्ट | अकलंक भट्ट | |
| ११७ | ६७८ | तोरणाचार्य | | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ११८ | ७००-७८० | हरिभद्रसूरि | श्वेतांबराचार्य | |
| ११९ | ६७५ | धर्मसेन नं. २ | | |
| १२० | ७०० | बलदेव नं. ३ | धर्मसेन नं. २ | |
| १२१ | ७०० | बलचंद्र. | | |

**इसवी सन शतक ८**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १२२ | ७०५-७२० | शांतिकीर्ति | नंदीसंघ बलात्कार | |
| १२३ | ७२०-७५८ | मेरुकीर्ति | नंदीसंघ बलात्कार | |
| १२४ | ७०३-७५३ | शांतिसेन नं. १ | पुन्नाट संघ | |
| १२५ | ७२८ | पुष्पनंदी | तोरणाचार्य | |
| १२६ | ७९७ | प्रभाचंद्र नं. २ | | |
| १२७ | ७२३-७७३ | जयसेन नं. २ | पून्नाट संघ | |
| १२८ | ७३८ | कुमारसेन नं. ३ | | |
| १२९ | ७४२-७७३ | चंद्रसेन | पंचस्तूप संघ | |
| १३० | ७४३-७९३ | अमितसेन | पुन्नाट संघ | |
| १३१ | ७६३-८१३ | कीर्तिसेन | पुन्नाट संघ | |

पान नं. २३१ वरुन

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १३२ | ७६३ पूर्व | प्रभाचंद्र नं. ३ | कुमारसेन नं. ३ | चंद्रोदय |
| १३३ | ७६३ पूर्व | चारित्रभूषण | | |
| १३४ | ७६७-७९८ | बप्पदेव | शुभनंदि | षट्खंड टीका |
| १३५ | ७७५-८४० | विद्यानंद नं. १ | मूलसंघ विभाजन | श्लोकवार्तिक |
| १३६ | ७६७-७९८ | आर्यनंदी | पंचस्तूप संघ | |
| १३७ | ७७६ | कुमारनंदी ४ | | वादन्याय |
| १३८ | ७७८-८२८ | जिनसेन नं. २ | पुन्नाटसंघ | हरिवंशपुराण |
| १३९ | ७७८ | उद्योतनसूरि | | कुवलयमाला |
| १४० | ७९२-८२३ | वीरसेन नं. १ | पंचस्तूपसंघ | धवला |
| १४१ | ७९२-८२३ | जयसेन नं. ३ | | |
| १४२ | ८ वे शतक उत्तरार्ध | यल्लवादी नं. २ | | नयचक्र |
| १४३ | ८००-८४३ | दशरथ | पंचस्तूप संघ | |
| १४४ | ८००-८४३ | जिनसेन नं. ३ | | जयधवला |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४५ | ८००-८४३ | विनसेन | पंचस्तूप संघ | |
| १४६ | ८००-८४३ | श्रीपाल | पंचस्तूप संघ | |
| १४७ | ८००-८४३ | पद्मसेन | पंचस्तूप संघ | |
| १४८ | ७५०-८१५ | देवसेन नं. १ | पंचस्तूप संघ | |

**इसवी सन शतक ९**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १४९ | ८०३-८०५ | गुणभद्र | पंचस्तूप संघ | उत्तरपुराण |
| १५० | ८०३-८५३ | रामसेन | माधुर संघ | |
| १५१ | ८१४-८७८ | महावीराचार्य | | गणितसारसंग्रह |
| १५२ | ८३१ | हरिषेण | | बृहत्कथाकोष |
| १५३ | ८४३-८७३ | गुणनंदी | नंदिसंघ देशी | |
| १५४ | ८४३-८९८ | लोंकसेन | पंचस्तूप संघ | |
| १५५ | ८५३-८८७ | पुष्यसेन | मूलसंघ | |
| १५६ | ८५८-८९८ | देवेंद्र | नंदीसंघ देशी | |
| १५७ | ८९८ | कुमारसेन | काष्ठा संघ | |
| १५८ | ८६८-९१८ | वीरसेन | माथुर संघ | |
| १५९ | ८७५-९७३ | गोलाचार्य | नंदीसंघ देशी | |
| १६० | ८७८-८९२ | बादीभसिंह | मूलसंघ विभाजन | स्याद्वादसिध्दि |
| १६१ | ८९३-९४३ | देवसेन नं. २ | माथुर संघ | दर्शनसार |
| १६२ | ८९३-९२३ | वसुनंदी | नंदीसंघ देशी | |
| १६३ | ८९८ | धर्मसेन नं. ३ | लाड बागड संघ | |
| १६४ | ९००-९४० | सिध्दांतसेन | अनंतवीर्य गुर्वाबली | |

**इसवी सन शतक १०**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६५ | इ. स. १० | अनंतकीर्ति नं. १ | | बृहत्सर्वज्ञसिध्दि |
| १६६ | इ. स. १० | अभयदेवसूरि | श्वेतांबराचार्य | वादमहार्णव |
| १६७ | ९०९ | विमलदेव | | |
| १६८ | ९००-९९८ | त्रैलोक्य त्यागी | नंदीसंघ देशी | |
| १६९ | ९१८-९४८ | सर्वचंद्र | नंदीसंघ देशी | |
| १७० | ९१८-९७३ | माघनंदी नं. २ | माघनंदि सघ | |
| १७१ | ९१८-९६८ | अमितगति नं. १ | माथुरसंघ | योगसार |
| १७२ | ९१८-९४३ | यशोदेव | सोमदेवाचे गुरु | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७३ | ९१८-९४३ | नेमिदेव | सोमदेवाचे गुरु | |
| १७४ | ९२३ | शांतिसेन | लाडबागड संघ | |
| १७५ | ९२५-९६५ | गौणसेन नं. ६ | अनंतवीर्य गुर्वाबली | |
| १७६ | ९२५-१०२५ | पद्मनंदी | नंदीसंघ देशी | |
| १७७ | ९२५-१०२५ | माणिक्यनंदी | नंदीसंघ देशी | परिक्षामुख |
| १७८ | ९२५-१०२१ | प्रभाचंद्र | नंदीसंघ देशी | प्रमेयकममार्त |
| १७९ | ९३७ | कुलभद्र | | सारसमुच्चय |
| १८० | ९४२ | पद्मकीर्ति भ. | | पार्श्वपुराण |
| १८१ | ९४३-९६८ | सकलचंद्र | माघनंदी संघ | |
| १८२ | ९४३-९६८ | वीरनंदी नं. २ | माघनंदी संघ | चंद्रप्रभचरित |
| १८३ | ९४३-९७३ | दामनंदी | नंदिसंघ देशी | |
| १८४ | ९४३-९९३ | नेमिसेन | माथुरसंघ | |
| १८५ | ९४३-९६८ | सोमदेव नं. १ | नेमिदेव | यशस्तिलक |
| १८६ | ९४८ | गोपसेन | लाडबागड | |
| १८७ | ९५०-९९० | रविभद्र | | आराधनासार |
| १८८ | ९५०-९९० | श्रीपाल नं. २ | गोणसेन | |
| १८९ | ९५०-१०४८ | नयनंदी | माणिक्यनंदी | |
| १९० | ९५०-९९० | अनतवीर्य नं. १ | गोणसेन | सिध्दि विनिवृत्ति |
| १९१ | ९५०-१०१५ | अमृतचंद्र | | पुरषार्थसिध्युपाय |
| १९२ | ९५३ | सिंहनंदी नं. ३ | | |
| १९३ | ९६८-९९८ | वीरनंदी नं. ४ | नंदीसंघ देशीगण | |
| १९४ | ९६८-१०१८ | माधवसेन | माथुर संघ | |
| १९५ | ९६८-१०२३ | श्रीनंदी | सकलचंद्र | |
| १९६ | ९६८-१०१८ | बालनंदी | वीरनंदी नं. ३ | |
| १९७ | ९७३ | यशःकीर्ति नं. २ | काष्ठा संघ | |
| १९८ | ९७३ | भावसेन | लाडबागड संघ | |
| १९९ | ९७५-१०१५ | देवकीर्ति | श्रीपाल द्वितीय | |
| २०० | ९७५-१०१५ | सिध्दांतभट्टारक | अनंतवीर्य | |
| २०१ | ९२३ | हेमचंद्र नं. १ | काष्ठा संघ | |
| २०२ | ९९३-१०४३ | पद्मनंदी नं. ४ | बालनंदी | जंबूदीवपण्णत्ति |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २०३ | ९९३-१०२३ | श्रीधर | नंदीसंघ देशी | |

पान नं. २३३ वरुन

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २०४ | ९९३-१११८ | शांत्याचार्य | | जैनतर्कवार्तिक |
| २०५ | ९९३-२०२१ | अमितगती नं. २ | माथुर संघ | सामायिक पाठ |
| २०६ | ९९८ | जयसेन नं. ४ | लाडबागड संघ | धर्म रत्नाकर श्रावकाचार |
| २०७ | ९९८ | क्षेमकीर्ति | काष्ठा संघ | |
| २०८ | १००० | लघु समंतभद्र | | अष्टसहस्त्री वृत्ति |
| २०९ | १०००-१०४० | वादिराज नं. २ | देवकीर्ति | न्यायविनिश्चयवृत्ति |
| २१० | १००० | क्षेमन्धर | बृहत्कथामंजरी | |

**इसवी सन शतक ११**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २११ | इ. स. १०-११ | अजितसेन | सिंहनंदी नं. ३ | |
| २१२ | इ. स. १०-११ | मेघचंद्र | | |
| २१३ | इ. स. १०-११ | अभयनंदी | | |
| २१४ | इ. स. १०-११ | वीरनंदी | अभयनंदी | |
| २१५ | इ. स. १०-११ | इंद्रनंदी | अभयनंदी | गोमट्टसार |
| २१६ | इ. स. ११ पूर्व | नेमिचंद्र नं. २<br>(सिध्दांन्त चक्रवर्ती) | | गोमट्टसार |
| २१७ | इ. स. ११ पूर्व | कनकनंदी | इंद्रनंदी | गोमट्टसार |
| २१८ | इ. स. ११ पूर्व | माधवचंद्र | | त्रिलोकसारवृत्ति |
| २१९ | इ. स. ११ पूर्व | विनयसेन नं. २ | | त्रिलोकसारवृत्ति |
| २२० | इ. स. ११ पूर्व | शक्तिकुमार | | जंबूद्वीपप्रज्ञप्ति |
| २२१ | इ. स. ११ पूर्व | नागनंदी | | |
| २२२ | इ. स. ११ पूर्व | धवलाचार्य | | |
| २२३ | इ. स. ११ पूर्व | शिवकोटि नं. २ | | रत्नमाला |
| २२४ | इ. स. १००८ | सिंहनंदी नं. २ | | |
| २२५ | १००८ | कुमार कार्तिकेय | | कार्तिकेयानुप्रेक्षा |
| २२६ | १०१३ | ब्रह्मसेन | जयसेन | |
| २२७ | १००३-११६८ | शुभचंद्र प्रथम | | ज्ञानार्णव |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २२८ | १०१५-१०५० | उदयदेव | | |
| २२९ | १०१५-१०५० | वादिभसिंह नं. २ | | गद्याचिंतामणि |
| २३० | १०१५-१०४५ | सिध्दांतिकदेव | शुभचंद्र | |
| २३१ | १०१६-११३६ | पद्मनंदी नं. ५ | वीरनंदी | पद्मनंदी पंचविशतिका |
| २३२ | १०१८-१०६८ | नेमिचंद्र नं. ३ | नयनंदी | |
| २३३ | १०१८-१०४८ | मल्लधारिदेव नं. १ | नंदीसंघ देशी | |
| २३४ | १०१८-१०७८ | कुलभूषण | नंदीसंघ देशी | |
| २३५ | १०२१-१०२५ | नृपनंदी | | |
| २३६ | १०४३-१०८३ | नेमिचंद्र नं. ४ | | द्रव्यसंग्रह |
| २३७ | १०४३-१०५३ | वसुनंदी नं. ३ | नेमिचंद्र नं. ३ | प्रतिष्ठापाठ |
| २३८ | १०४३-११०३ | कुलचंद्र | नंदीसंघ देशी | |
| २३९ | १०४३-१०७३ | चंद्रकीर्ति नं. १ | नंदीसंघ देशी | |
| २४० | १०४७ | मल्लिषेण नं. १ | नंदीसंघ देशी | सज्जनचित्तवल्लभ |
| २४१ | १०४८ | वीरसेन नं. ३ | लाडबागड संघ | |
| २४२ | १०२१-१०५५ | मानतुंग | | |
| २४३ | १०६१-१०८१ | सोमदेव नं. २ | | बृहत्कथासरितसागर |
| २४४ | १०६८-१०६९ | दिवाकरनंदी | नंदिसंघ देशी | |
| २४५ | १०७३ | गुणसेन नं. १ | लाडबागड संघ | |
| २४६ | १०८८-१०७३ | हेमचंद्र नं. २ | श्वेतांबराचार्य | प्राकृत व्याकरण |
| २४७ | १०९३-११२३ | शुभचंद्र नं. २ | | |
| २४८ | १०९८ | उदयसेन नं. १ | लाडबागड संघ | |
| २४९ | १०९८ | नरेंद्रसेन | लाडबागड संघ | सिध्दांतसारसंग्रह |

**इसवी सन शतक १२**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २५० | इ. स. १२ | योगचंद्र | | योगसार |
| २५१ | इ. स. १२ | महेंद्रदेव | | |
| २५२ | इ. स. १२ | वीरचंद्र नं. १ | | |
| २५३ | इ. स. १२ | शुभचंद्र नं. ३ | | |
| २५४ | इ. स. १२ | नागसेन | महेंद्रदेव वीरचंद्र | तत्वानुशासन |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | (जयसिंहसूरि) | |
| २५५ | ११०२ | चंद्रप्रभसूरि | जयसिंहसूरि | प्रमेयरत्नकोष |
| २५६ | ११०८-११३६ | माघनंदी नं. ३ | नंदीसंघ देशी | |
| २५७ | १११२ | नयसेन | | धर्मामृत |
| २५८ | १११७-११६९ | वादिदेवसूरि | श्वेतांबराचार्य | स्याद्वादरत्नाकर |
| २५९ | १११७-११६९ | गुणसेन नं. १ | लाडबागड संघ | |
| २६० | ११२३ | गुणसेन नं. २ | लाडबागड संघ | |
| २६१ | ११२३ | जयसेन नं. ५ | लाडबागड संघ | |
| २६२ | ११२८ | मल्लधारी नं. २ | लाडबागड संघ | |
| २६३ | ११२८ | मल्लिषेण नं. २ | लाडबागड संघ | वज्रपंजरविधान |
| २६४ | ११३३-११६३ | माघनंदी नं. ४ | नंदिसंघ देशी | |
| २६५ | ११३३-११६३ | देवकीर्ति नं. २ | नंदिसंघ देशी | |
| २६६ | ११३३-११६३ | देवचंद्र नं. १ | नंदिसंघ देशी | |
| २६७ | ११३३-११६३ | श्रुतकीर्ति | नंदिसंघ देशी | |
| २६८ | ११३३-११६३ | कनकनंदी | नंदिसंघ देशी | |
| २६९ | ११३३-११६३ | गंड विमुक्तदेव | नंदिसंघ देशी | |
| २७० | ११४०-११८५ | मल्लधारिदेव नं. ३ | | नियमसार टीका |
| २७१ | ११५८-११८८ | देवकीर्ति नं. ३ | नंदिसंघ देशी | |
| २७२ | ११५८-११८२ | रामचंद्र | नंदिसंघ देशी | |
| २७३ | ११५८-११८२ | गंडविमुक्तदेव २ | नंदिसंघ देशी | |
| २७४ | ११५८-११८८ | भानुकीर्ति | नंदिसंघ देशी | |
| २७५ | ११५८-११८५ | शुभचंद्र नं. ४ | नंदिसंघ देशी | |
| २७६ | ११५८-११८२ | अकलंक नं. २ | नंदिसंघ देशी | |
| २७७ | ११६३ | वीरनंदी नं. ५ | | आचारसार |
| २७८ | ११६८-११९३ | नयकीर्ति | | चरणसार |
| २७९ | ११६८ | पद्मनंदी नं. ५ | | समाधितंत्र टीका |
| २८० | ११८५-१२४३ | प्रभाचंद्र नं. ५ | | |
| २८१ | ११८६ | अनंतकीर्ति नं. २ | | तत्वानुशासन |
| | २८२ | इ. स. १२-१२ | रामसेन नं. ३ | |

**इसवी सन शतक १३**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २८३ | इ. स. १३ | यशःकीर्ति नं. ४ | | जगत्सुनदरीप्रयोगमाला |
| २८४ | इ. स. १३ | भास्करनंदी | | तत्त्वार्थसूत्रवृत्ति |
| २८५ | इ. स. १३ | अभयचंद्र नं. १ | | स्याद्वादभूषण |
| २८६ | इ. स. १३ | विनयचंद्र | | उवएसमाला |
| २८७ | १२०५ | पार्श्व पंडित | | पार्श्वनाथपुराण |
| २८८ | १२०६ | धर्मसूरी | | जंबूस्वामी सरना |
| २८९ | १२०६ | जन्नाचार्य | | अनंतनाथ पुराण |
| २९० | १२१४ | धर्मचंद्र भ. | | पुष्पदंतपुराण |
| २९१ | १२१४ | ललितकीर्ति | | |
| २९२ | १३३० | गुणवर्म | | |
| २९३ | १२३९ | कुमार पंडित ८ | | |
| २९४ | १२३९ | यशःकीर्ति ३ | | |
| २९५ | १२३९ | रत्नकीर्ति नं. २ | | |
| २९६ | १२४३-१२९८ | त्रेविद्यदेव नं. २ | | |
| २९७ | १२५८-१३१६ | पद्मनंदी नं. ७ | त्रेविद्यदेव | |
| २९८ | १२५६ | प्रभाचंद्र नं. ७ | | पंचास्तिकाय टीका |
| २९९ | १२८०-१३३० | पद्मनंदी नं. ८ | | यत्याचार |
| ३०० | १२८३-१३१३ | शुभचंद्र नं. ५ | | |
| ३०१ | १२९२-१३२३ | जयसेन नं. ६ | | समयसार टीका |
| ३०२ | १२९२-१३२३ | ब्रह्मदेव | | द्रव्यसंग्रह टीका |
| ३०३ | १२९२ | मल्लिषेण नं. ३ | श्वेतांबराचार्य | स्याद्वादमंजरी |
| ३०४ | १२९३-१३२३ | पद्मनंदी नं. ६ | शुभचंद्र नं. ५ | |

**इसवी सन शतक १४**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३०५ | इ. स. १४ | धर्मभूषण नं. २ | | न्यायदीपिका |
| ३०६ | इ. स. १४ | श्रीधर नं. ३ | | भविष्यदत्त |
| ३०७ | १३०५ | प्रभाचंद्र नं. ७ | नंदिसंघ बलात्कार | |
| ३०८ | १३२८-१३९८ | पद्मनंदी नं. १० | | भावनापध्दति |
| ३०९ | १३३३-१३४३ | अभयचंद्र नं. ५ | नंदिसंघ बलात्कार | गोम्मटसार टीका |
| ३१० | १३७४ | रामसेन नं. ३ | काष्ठासंघ | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३११ | १३५०-१३९० | | | |
| ३१२ | १३५० | बालचंद्र | | पंचास्तिकाय टीका |
| ३१३ | १३५६ | धर्मभूषण नं. १ | | |
| ३१४ | १३९९ | रत्नकीर्ति नं. ३ | काष्ठासंघ | |

**इसवी सन शतक १५**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३१५ | १४१४ | लक्ष्मणसेन नं. २ | | |
| ३१६ | १४२९ | दयासागरसूरि | | धर्मदत्त च. |
| ३१७ | १४३३-१४७३ | देवेन्द्रकीर्ति नं. १ | पद्मनंदी नं. १० | |
| ३१८ | १४३३-१४४२ | सकलकीर्ति | नंदिसंघ बलात्कार | सुकुमाल च. |
| ३१९ | १४४८-१४६८ | विद्यानंदी नं. २ | नंदिसंघ बलात्कार | सुदर्शन च. |
| ३२० | १४४८-१४६८ | मल्लिभूषण | नंदिसंघ बलात्कार | |
| ३२१ | १४४९ | भीमसेन | काष्ठासंघ | |
| ३२२ | १४५१-१४७० | भुवनकीर्ति | नंदीसंघ बलात्कार | |
| ३२३ | १४७३-१५३३ | श्रुतसागर | नंदीसंघ बलात्कार | तत्त्वार्थवृत्ति |
| ३२४ | १४७० | रत्नकीर्ति नं. ४ | अनंतकीर्ति भ. | भद्रबाहु च. |

कालानुक्रमे इतर कांही लेखक, त्यांचा काल व रचना (विशेषता)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३२५ | १४७४ | सोमकीर्ति | | प्रद्युम्न चरित्र |
| ३२६ | १४४०-१४५० | यशःकीर्ति | | पांडवपुराण, हरिवंशपुराण |
| ३२७ | १४९८-१५१८ | श्रीचंद्र | | वैराग्यमणिमाला |
| ३२८ | १५०० | कोटीश्वर | | जीवंधर शतपदी |

**इसवी सन शतक १६**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३२९ | इ. स. १६ पूर्व | नेमिचंद्र नं. ५ | गोम्मटसार टीका | जीवनतत्वप्रबोध |
| ३३० | १५१६-१५५६ | शुभचंद्र नं. ७ | व्याकरण | प्राकृतव्याकरण |
| ३३१ | १५१८ | सिध्दांतसागर | | यशस्तिलक चंद्रिका |
| ३३२ | १५१८ | ब्र. नेमिदत्त | | आराधना कथाकोष |
| ३३३ | इ. स. १६ | सिंहनंदी | | पंचनमस्कार मंत्र माहात्म्य |
| ३३४ | १४४६-१६०५ | पं. राजमल्ल | | पंचाध्यायी |
| ३३५ | १५५६-१६०६ | रायमल्ल | | हनुमंतचरित |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३३६ | १५६३-१५६८ | सुमतिकीर्ति | | पंचसंग्रह टीका |
| ३३७ | १५८३-१६०५ | देवेंद्रकीर्ति | | कथाकोष |
| ३३८ | १५९७ | चंद्रकीर्ति | | आदिपुराण |

**इसवी सन शतक १७**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३३९ | १६०४ | भट्टाकलंक | व्याकरण | शब्दानुशासन |
| ३४० | १६३८-१६८८ | यशोविजय (श्वेतांबराचार्य) | न्याय | जैनतर्क, अष्टसहस्त्र टीका |
| ३४१ | १६४३-१६७० | पं. हेमचंद्र | तत्त्वार्थ | पंचास्तिकायव. |
| ३४२ | १६५६ | कवि अरुणमणि | प्रथमानुयोग | अजितपुराण |
| ३४३ | १६७७ | विनय विजय | न्याय | न्यायकर्णिका |

**इसवी सन शतक १८**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | ३४४ | इ. स. १८ | जिनसागर | प्रथमानुयांग जीवंधरपुराण |
| ३४५ | १७१८ | ज्ञानचंद्र | तत्त्वार्थ | पंचास्तिकाय टीका |
| ३४६ | १७२३ | पं. द्यानतराय | पदसंग्रह | धर्मविलास |
| ३४७ | १७३६ | पं. टोडरमल | कर्मसिध्दांत | गोम्मटसार टीका |
| ३४८ | इ. स. १७-१८ | पं. भूधरदास | छंदबध्द | पार्श्वपुराण, जैनशतक |

**इसवी सन शतक १९**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३४९ | १८०६ | पं. जयचंद छाबडा | न्याय | परीक्षमुख टीका इतर |
| ३५० | १८१४ | पं. बुधजन | तत्त्वार्थबोध | तत्त्वार्थबोध |
| ३५१ | १८३९ | देवचंद्र | प्रथमानुयोग | रानावलिकथे |

**इसवी सन शतक २०**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ३५२ | | शांतिसागर महाराज | | खंडित मुनि संप्रदायाची स्थापना, मुक्त विहार |
| | ३५३ | | वीरसागर | |
| ३५४ | | शिवसागर | | |
| ३५५ | | धर्मसागर | | |
| ३५६ | | समंतभद्र | | शिक्षणप्रसार |
| ३५७ | | कल्पशीतसागर | | |
| ३५८ | | कुंथुसागर | | |
| ३५९ | | सहजानंद | | |
| ३६० | | विद्यानंद | | |